





कै. हेमाडपंत

## 'श्री साईसच्चरित'

# साई भक्तांची गीता-ज्ञानेश्वरी

ले. कर्नल मु.ब.निंबाळकर (निवृत्त)

संतांचे चरित्र गायन हे सद्‌गुणवृद्धिसाठी एक सामाजिक गरज आहे. 'सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ।' असे एक संतवचन प्रसिद्ध आहे. कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर उर्फ 'हेमाडपंत' यांनी 'श्री साईसचरित' नावाचा ५३ अध्यायांचा ९४५० ओव्यांचा ग्रंथ लिहून श्री साईबाबांचे रसाळ चरित्र गायन केलेले आहे. साईभक्तांना हा ग्रंथ गीता-ज्ञानेश्वरी प्रमाणेच प्राणप्रिय आहे.

'श्री साईसच्चरित' हा ग्रंथ साईबाबांच्या अगाध-अनंत लीलांचे गुणवर्णन आहे तसाच तो साहित्याच्या दृष्टिनेही संपन्न आहे. चरित्रकार हेमाडपंताचे रसाळ कवित्त्व व त्यांच्या श्रेष्ठदर्जाच्या काव्याचा साईभक्त निंबाळकर यांनी करून दिलेला साद्यंत परिचय-





कै. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर उर्फ हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साईसत्चरिताचे अध्यात्मिक श्रेष्ठत्व निर्विवाद आहे. त्यात श्री साईबाबांसारख्या संतशिरोमणींचा जीवनवृत्तांत आहे. त्यांचा अमृततुल्य उपदेश आहे. त्यांच्या चमत्कारांच्या, भक्तांच्या अनुभवांच्या अनेक कथा आहेत. वेदांत व गीतेतील सार तर ठिकठिकाणी गोवलेला आहे. मुख्य म्हणजे हा ग्रंथ श्री साईबाबांची आज्ञा व आशीर्वाद घेऊन लिहिलेला असल्याने मुमुक्षुजनांना मोक्षसाधनेसाठी मार्गदर्शक झालेला आहे. कै. बाळकृष्ण वि. देव (बाबांचे बाळ) अवतरणिकेच्या ५३ व्या अध्यायात म्हणतात:

**ग्रंथ नव्हे हा कल्पवृक्ष। संसारजनां वाटे रूक्ष।**
**मुमुक्षुभाविकां केवळ मोक्ष।**
**अनुभव प्रत्यक्ष पहावा ॥१७१॥**

परंतु विषय कितीही उत्तम असला तरी तो भक्तांपुढे ठेवताना त्याला भाषेचे माधुर्य किंवा रसाची गोडी नसली तर वाचकांना तो पुन्हा पुन्हा वाचायला व श्रोत्यांना तो पुन्हा पुन्हा ऐकायला आवडत नसतो. श्री साईसत्चरितातील बऱ्याचशा ओव्या कानाला गोड लागून मनाचे वेध घेतात आणि त्या पुन्हा पुन्हा म्हणावयाशा वाटतात. तेव्हा त्या ओव्या रचताना हेमाडपंतांनी आपले सर्व कलाकौशल्य खर्च केले असले पाहिजे. आपण आता त्याचेच विवेचन करणार आहोत. म्हणजे श्री साईसत्चरितातील काव्याचे रसग्रहण करणार आहोत.

## छंदाची निवड

महाराष्ट्रातील बहुतेक संतांनी मराठी भाषेत आध्यात्मिक ग्रंथ रचताना 'ओवी' या छंदाचाच उपयोग केलेला आहे. उदा. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध इत्यादी. या छंदात चार चरण असतात. पहिल्या तीन चरणांना यमक (चरणाच्या शेवटी तेच अक्षर पुन्हा पुन्हा वापरणे) असते. पण अक्षरांच्या संख्येचे बंधन फारच शिथील असते. ५ ते १५ अक्षरेही चालू शकतात. चौथ्या चरणाला यमक नसते, परंतु त्यातील अक्षरे पहिल्या तीन चरणांतील अक्षरांपेक्षा अधिक अक्षरें असत नाहीत. उदा.

**आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।**
**तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ ८७६ ॥**

- ज्ञानेश्वरी, अध्याय १८

(पहिल्या तीन चरणांना यमक . चौथ्या चरणाला यमक नाही.)

**तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।**
**अति हळुवारपणा चित्ता । आणुनियां ॥ ५७ ॥**

- ज्ञानेश्वरी, अध्याय १

(पहिल्या चरणात ६ अक्षरे, दुसऱ्यात ८, तिसऱ्यात १० आणि चौथ्या त सर्वांहून कमी म्हणजे ४ च अक्षरे.)

हेमाडपंतांनीही आपल्या श्री साईसत्चरितासाठी 'ओवी' हाच छंद निवडलेला आहे. परंतु त्यातल्या त्यात एकनाथी भागवताची चौथ्या चरणात एक जास्तीचे यमक असलेल्या ओव्यांची धाटणी स्वीकारून आपल्या ओव्यांना आणखी शोभा आणली आहे. उदा.

**भक्तीस विकला भगवंत । भक्तांचें उच्छिष्ट काढीत ।**
**रणांगणीं घोडे धूत । शेखी होत द्वारपाळ ॥**

- एकनाथी भागवत

**मग जो गाई वाडेंकोडें । माझें चरित्र माझे पवाडे ।**
**तयाचिया मी मागें पुढें । चोहींकडे उभाची ॥ १२॥**

- श्री साईसत्चरित, अध्याय ३

## काव्यालंकार

आता हेमाडपंतांनी श्री साईसत्चरितात कोणकोणते काव्यालंकार वापरले आहेत ते आपण पाहू या.

**स्वभावोक्ति** (Picturesque Description)

स्वभावोक्ती म्हणजे एखाद्या प्रसंगाचे हुबेहुब व वेधक वर्णन किंवा सुंदर शब्दचित्र तयार करणे होय. श्री साईसत्चरित हा ग्रंथ मुख्यत: वर्णनात्मक कथांनी भरलेला असल्याने त्यातील प्रसंगाचे वर्णन हेमाडपंतांनी कसे केले हे महत्त्वाचे आहे. खरे म्हणजे हुबेहूब व वेधक वर्णन करण्यात आणि एखाद्या घटनेचे सुंदर शब्दचित्र डोळ्यांसमोर उभे करण्यात हेमाडपंतांचा हातखंडाच दिसतो. उदा.

(१) साईबाबांशी प्रथमच झालेल्या हेमाडपंतांच्या स्वत:च्या भेटीचे वर्णन पहा :

**ऐसें ऐकूनि घाईघाई । धांवलों बाबा होते त्या ठाई ।**
**धुळींत घातलें लोटांगण पाईं ।**
**आनंद न माई मनांत ॥ १३७ ॥**
**नानासाहेब सांगूनि गेले ।**
**त्याहूनि अधिक प्रत्यक्ष पाहिलें ।**
**दर्शनें म्यां धन्य मानिलें । साफल्य झालें नयनांचें ॥ १३८ ॥**
**कधीं ऐकिली नाहीं देखिली । मूर्ति पाहूनि दृष्टि निवाली ।**
**तहान भूख सारी हरपली । तटस्थ ठेलीं इंद्रियें ॥ १३९ ॥**
**लाधलों साईंचा चरणस्पर्श । पावलों जो परामर्ष ।**
**तोचि या जीवाचा परमोत्कर्ष ।**
**नूतन आयुष्य तेथूनि ॥१४० ॥**

- अध्याय २





(२) आता मिरीकरांवरच्या सर्पाच्या गडांतराचे वर्णन पहा.

**सर्प एक त्या काळवेळे । कैसा कोठूनि आला नकळे ।**
**बैसला करूनियां वेटोळें ।**
**चुकवूनि डोळे सकळांचे ॥ ७८ ॥**
**मिरीकरांचे कंबरेवर । होता उपरण्याचा पदर ।**
**तया मृदुल आसनांवर । शांत निर्घोर बैसला ॥ ७९ ॥**
**प्रवेश करितां ओजें ओजें ।**
**सुर सुर सुर सुर कागद वाजे ।**
**परी न कोणा तया आवाजें । घेणें साजे सर्पशंका ॥ ८० ॥**
**इतुका भयंकर जरी प्रसंग । मिरीकर खबरपत्रांत दंग ।**
**परी पट्टेवाल्यांचे अंतरंग । कल्पनातरंगी वाहविलें ॥ ८१ ॥**
**येतो कोठूनि तो आवाज ।**
**असावा कशाचा काय काज ।**
**म्हणोनि उचलितां बत्ती जूज ।**
**लंबूमहाराज देखिले ॥८२ ॥**

- अध्याय २२

(३) काकासाहेब दीक्षित बाबांच्या आज्ञेने बोकड मारावयास तयार झालेल्या प्रसंगाचे वर्णन तर किती हुबेहूब !

**गुर्वाज्ञा–पालनीं निधडा । केला मनाचा एकदां धडा ।**
**परी छाती उडे धडधडा । घाम भडभडा सूटला ॥१५२ ॥**
**मग कास घालुनी एके हातीं । दुजियानें शस्त्र सांवरिती ।**
**अस्तन्या सारीत सारीत येती ।**
**अजा होती ते स्थानीं ॥ १५८ ॥**
**मांरू जातां घाई घाई । कृपा उपजली तयां हृदयीं ।**
**सुरा चांचरे मागें जाई । हस्त न होई पुढारा ॥ १६४ ॥**

- अध्याय २३

(४) औरंगाबादेहून आलेली पाल ती काय आणि भिंतीवर चुकचुकणारी पाल ती केवढीशी ! पण त्यांच्या भेटीचे वर्णन किती बहारदार !

**ती जी तेथूनि निघाली तडक ।**
**ताई करीत होतीच चुकचुक ।**
**धरूनियां त्या आवाजावर रोख ।**
**चमकत ठुमकत चालली ॥ ९३ ॥**
**बहिणी–बहिणींची ती गांठ । बहुतां दिसीं झाली भेट ।**
**चुंबिती मुख आलिंगिती दाट ।**
**प्रेमाचा थाट अनुपच ॥ ९४ ॥**
**एकमेकींस घालीत गिरक्या । आनंदाने मारीत भिरक्या ।**
**गेल्या उभ्या आडव्या तिरक्या ।**
**स्वच्छंद फिरक्या मारीत ॥ ९५ ॥**

- अध्याय १५

(५) चावडीच्या मिरवणुकीच्या वर्णनाला तर तोडच नाही पहा :

**तात्याबा वाम हस्त धरी । म्हाळसापति दक्षिण करीं ।**
**बापूसाहेब छत्र शिरीं । चालली स्वारी चावडीसी ॥१४५ ॥**
**आघाडी घोडा तो ताम्रवर्ण । नाम जयाचें श्यामकर्ण ।**
**घुंगुरें झणत्कारिती चरण । सर्वाभरणमंडित जो ॥ १४६ ॥**
**वेत्रपाणी पुढें चालत । साईनामाचा लकार करीत ।**
**छत्रधारी छत्र धरीत । चवऱ्या वारीत चवरधर ॥१४७ ॥**
**ताशे वाजंत्रे वाजत । भक्त जयजयकारें गर्जत ।**
**ऐसा भक्तसंभार चालत । प्रेमें पुकारत भालदार ॥ १४८ ॥**

- अध्याय ३७

(६) पावसाने शिरडीत केलेला कहर आणि वीजांनी केलेला कडकडाट समर्थ बाबांनी कसा आवरला त्याचे वर्णन ऐका :

**चालली आरोळीवर आरोळी । नाद दुमदुमला निराळीं ।**
**वाटे मशीद डळमळली ।**
**कांटाळी बैसली सकळांची ॥१२९॥**
**त्या गिरागजर तारस्वरें । दुमदुमलीं मशीद–मंदिरें ।**
**तंव मेघ निजगर्जना आवरे । वर्षाव थारे धारांचा ॥१३०॥**
**हळू हळू पाऊस उगवला । सोसाटाही मंदावला ।**
**नक्षत्रगण दिसूं लागला । तम निरसला ते काळीं ॥१३३॥**
**अलर्क्य बाबांचे विंदान । जाहलें वर्षावा आकर्षण ।**
**वायूही आवरला तत्क्षण । धुई विच्छिन्न जाहली ॥१३२॥**

- अध्याय ११

(७) नानासाहेब निमोणकर व माधवराव देशपांडे मशिदीत वाढत असलेल्या जेवणाचे वर्णन वाचून तर तोंडाला पाणीच सुटते :

**भात सुग्रास जिरेसाळी । जैसी मोगरियाची कळी ।**
**वरी तुरीची दाळी पिवळी ।**
**घृत पळी पळी समस्तां ॥१७१॥**
**वाढितां ये आमोद घमघमित ।**
**चटणियांसीं भोजन चमचमित ।**
**अपक्क अरुचिर नाहीं किंचित ।**
**येथेष्ट निश्चित जेविती ॥१७२॥**

- अध्याय ३८





(८) आणि शेवटी बाबांच्या निर्याणसमयीचे अवघड वर्णनही किती सहजपणे पण अगदी यथार्थ चटक लावणाऱ्या शब्दांत केले आहे !

**आयुर्दायस्नेह सरतां । प्राणज्योती मंद होतां ।**
**बयाजीचे अंकावरता । देह विश्रामता पावला ॥१४०॥**
**नाहीं पडून वा निजून । स्वस्थपण गादीसी बैसून ।**
**ऐसा स्वहस्तें धर्म करून । केलें विसर्जन देहाचें ॥१४१॥**

– अध्याय ४२

## उपमा (Simile)

उपमा म्हणजे दोन वस्तूंतील सारखेपणा सुंदररीतीने वर्णन करणे. यामुळे शब्दचित्राला आणखी शोभा येते आणि ओव्यांचा भावार्थही स्पष्ट होतो. म्हणूनच की काय हेमाडपंतांनी या ग्रंथात एकाहून एक सुंदर व यथार्थ उपमांची रेलचेल केली आहे. संसाराला सागराची, अज्ञानाला अंधाराची, ज्ञानाला प्रकाशाची वगैरेसारख्या सांप्रदायिक उपमा तर आहेतच, परंतु हेमाडपंतांचे श्रेष्ठ कवित्व दर्शविणाऱ्या अनेक उपमा आपल्याला ठिकठिकाणी आढळतात. उदा :

**(१) कृपण वावरो कवण्याही गांवा ।**
**चित्तासमोर पुरलेला ठेवा ।**
**जैसा तयासी अहर्निशीं दिसावा ।**
**तैसाचि वसावा साई मनीं ॥१८५॥**

– अध्याय ३

**(२) लंपट गुळाचिये गोडी ।**
**सांडी न मुंगी तुटतां मुंडी ।**
**तैसी द्या साईचरणी दडी ।**
**कृपापरवडी रक्षील तो ॥१७१॥**

– अध्याय २७

**(३) गोरसेंसी वत्स धालें । तरी न मायेपासूनि हाले ।**
**तैसें मन हें पाहिजे बांधिलें ।**
**दावणीं दाविले गुरुपायीं ॥७७॥**

–.अध्याय ३७

**(४) जैसें कनक आणि कांति ।**
**जैसा दीप आणि दीप्ति ।**
**तैसीचि हे गुरुशिष्यस्थिती ।**
**ऐक्यप्रतीति उभयांसी ॥१३४॥**

– अध्याय ५

**(५) समुद्रींचें क्षारोदक । मेघाहातीं पडतां देख ।**
**होतें जैसें गोड पीयूख ।**
**तें सुख जडतां गुरुपायीं ॥७९॥**

– अध्याय ८

**(६) कासवी जैसी आपुले पोरां ।**
**घालिते निजदृष्टीचा चारा ।**
**तैसीच माझे गुरूची तऱ्हा ।**
**दृष्टीनें लेंकरां सांभाळी ॥६८॥**

– अध्याय १९

**(७) मी कोणावरीही रागवतां ।**
**ठावें न चित्ता माझिया ॥७४॥**
**माय हाणी लेंकूरा लाता ।**
**समुद्र करी नदियां परता ।**
**तरीच मी होय तुम्हां अव्हेरिता ।**
**करीन अहिता तुमचिया ॥७५॥**

– अध्याय ११

**(८) सागरासी देतां आलिंगन ।**
**सरिता विसरले सरितापण ।**
**तैसा भक्त येतां शरण ।**
**नुरविसी दुजेपण भक्ताचें ॥१८॥**

– अध्याय ५२

या उपमा मुळात सुंदर आहेतच व त्यामुळे वाचकांच्या मनाला आनंद होतोच, पण त्याबरोबर त्या ओव्यांतील ग्रंथकाराचे विचार समजण्यास आपणाला मदतही होते. आता पुढील उपमा पहा :

**(९) पांडुरंगमूर्तीचें वदन । ज्या दिव्य तेजें शोभायमान ।**
**त्याच तेजें साईमुखमंडन ।**
**पाहूनि विस्मयापन्न धुरंधर ॥२४६॥**
**वीज जैसी नभोमंडळीं ।**
**तळपे कोणा न लक्षे भूतळीं ।**
**तैसें तेज साईंच्या निंढळीं ।**
**चमकोनि डोळे दीपले ॥२४७॥**

– अध्याय ५१

**(१०) माता पिता भगिनी भ्राता ।**
**दारा पुत्र सुता चुलता ।**
**नदीप्रवाही काष्ठें वाहतां ।**
**एकत्र मिळतात तैसे हे ॥२२॥**





दिसलीं क्षण एक एकवट। लाटेसरसी फाटाफूट।
होऊनि पडे जैं ताटातूट।
जुळेना तो घाट पुनश्च ॥२३॥

- अध्याय १४

(११) मळ काढिती कोणी रिठ्यानें।
कोणी साबणादिकीं साधनें।
कोणी शुद्ध निर्मल जीवनें।
निंदक जिव्हेनें काढिती ॥१९५॥

- अध्याय १९

तिन्ही ओव्यातील विषय किती भिन्न, परंतु हेमाडपंतांची उपमेतील नैपुण्य मात्र अगदी सतत उत्तम. असो. आता पुढील उपमा पहा. हेमाडपंत मधून मधून एखादी गोष्ट नीट ठसविण्यासाठी लागोपाठ अनेक उपमा वापरतात आणि त्याही सुंदरच:

(१२) एवं शेटजी सुखांत होते।
घेतलें जरी हें जगाचिया चित्तें।
परी वित्ताचें सौख्य विफल तें।
पुत्रहीनातें सर्वथा ॥७१॥
प्रेमावीण हरिकीर्तन। तालस्वरावीण गायन।
यज्ञोपवीतावीण ब्राह्मण।
शोभा कवण तयाची ॥७३॥
आहे सकलकलाप्रवीण। नाहीं सारासार ज्ञान।
भूतदयाहीन आचारसंपन्न।
शोभा कवण तयाची ॥७४॥
भाळीं टिळे गोपीचंदन।
गळां तुळशीमाळा भूषण।
जिव्हा करी संतविडंबन।
शोभा कवण तयाची ॥७५॥
अनुतापावीण तीर्थाटन। गळसरीवीण अलंकरण।
पुत्रावीण गृहस्थसदन।
शोभा कवण तयाची ॥७६॥

- अध्याय १४

(१३) बाबांवीण शिरडी ओस। दाही दिशा शून्य उदास।
प्राण जातां जे शरीरास।
कळा शिरडीस ते आली ॥९३॥
सुकोनि जातां तळ्यांतील जीवन।
तळमळती जैसे आंतील मीन।
तैसे झाले शिरडीचे जन। कलाहीन उद्विग्न ॥९४॥
कमलावीण सरोवर। पुत्रावीण शून्य घर।
कीं दीपावीण मंदिर।
मशीदपरिसर तो तेवीं ॥९५॥
कीं धरधन्यावीण घर। कीं राजयावीण नगर।
कीं द्रव्यावांचूनि भांडार।
शिरडी कांतार बाबांविणें ॥९६॥

- अध्याय ४३

असो. अशी उपमांची कितीतरी उदाहरणे देता येतील. परंतु जागेच्या अभावी एवढ्याच पुरे. तरीपण जाता-जाता एक अति उत्तम उपमाचे तसेच सुंदर मनोवेधक शब्दचित्राचे उदाहरण दिल्याशिवाय राहवत नाही :

नुकतीच पाजूनि गेली बाहेरी।
मागुतेनि अली जरी मार्जारी।
तरी फिरफिरोनि पोरें तिजवरी।
धांवती प्रेमभरीं लुंचावया ॥१२॥
मग ते कंटाळूनी गुरगुरे। क्षणैक जरी दबती पोरें।
आई निवांत बैसली पुरे। घालोनि भंवरे लुंचती ॥१३॥
लुंचतां ढोसतां प्रेमभरें। आईलागीं पान्हा पाझरे।
मग ती तीच पूर्वील गुरगुरणे विसरे।
प्रीतीनें पसरे क्षीतीवरी ॥१४॥
प्रेमोदयी हरपे कंटाळा।
चौपयीं कवआळी दृढ निजबाळां।
वरचेवरी चाटी अवलीळा।
काय तो सोहळा आलोलिक ॥१५॥
पोरांच्या तीक्ष्ण नखप्रहारें।
जों जों मातेची ओंटी विदारे।
तों तों अधिक प्रेमाचे झरे। दुग्ध ओझरे बहुधारा ॥१६॥
जैसी त्या बाळांची अनन्य भक्ति।
मातेसी करी दुग्धोत्पत्ति।
तैसीच तुमची साईपदासक्ति।
द्रववील चितीं साईतें ॥१७॥

- अध्याय १५

## दृष्टांत (Example)

दृष्टांतातही उपमेसारखाच दोन वस्तूंचा सारखेपणा दर्शविला जातो. परंतु त्या सादृश्य दाखविण्यासाठी 'जसे, सारखे' साम्यवाचक शब्द नसतात. हेमाडपंतांनी आपले विचार अधिक स्पष्ट करण्यासाठी





दृष्टांताचा अत्यंत कुशलतेने भरपूर उपयोग केला आहे. उदा

(१) साईबाबा आपल्याजवळ हृदयातच असताना त्यांच्यासाठी दुसरीकडे धावाधाव कशाला करायची ! म्हणून हेमाडपंत म्हणतात :

**निज नाभींत असतां जवादी । किमर्थ भ्रमावे बिदोबिदीं ।**
**अखंड विनटत साईपदीं ।**
**हेमाड निरवधि सुख लाहे ॥१६८॥**

- अध्याय ३६

(२) कोणत्याही गोष्टीची जाणीव आपल्या त्यावेळच्या मनाच्या स्थितीवर असते हे सांगण्यासाठी हेमाडपंत चाबुकाचा व फुलाचा दृष्टांत देतात :

**चाबुकेंहाणितां हांसे उसळे । फुलाच्या मारें रडें कोसळे ।**
**वृत्तीचे तरंग भावनाबळें ।**
**कोणास न कळे अनुभव हा ॥१२३॥**

- अध्याय २४

(३) परमार्थासाठी दीर्घ प्रयत्न करावा लागतो यासाठी अगदी रोजच्या व्यवहारातील तुपाचा दृष्टांत पहा :

**दुग्धापोटीं आहे घृत । परी न करितां तें आम्लयुक्त ।**
**नाहीं तक्र ना नवनीत । तेही अपेक्षित संस्कारा ॥८२॥**
**तक्र घुसळल्याविरहित । प्राप्त होईना नवनीत ।**
**तेंही न करितां अग्निसंयुक्त ।**
**स्वादिष्ट घृत लाभेना ॥८३॥**

- अध्याय ३७

(४) तुपाचा आणखी एक दृष्टांत पहा :

**सगुण तेंचि साकार । निर्गुण ते निराकार ।**
**भिन्न नाहीं परस्पर । साकार निराकार एकचि ॥१३॥**
**थिजलें तरी तें घृतचि संचलें ।**
**विघुरलें तेंही एकचि भरलें ।**
**समरसलें विश्वरूपें ॥१४॥**

- अध्याय ११

(५) तसेच समोर ज्ञान दिसत असून अज्ञानाकडेच ओढा असणाऱ्या मूर्खांबद्दल गोचिड आणि दर्दुर (म्हणजे बेडूक) यांचे दृष्टांत किती समर्पक आहेत !

**दुग्धें तुडुंब गळती सड । तेथेंच घट्ट चिकटले गोचिड ।**
**परी तया अशुद्धीं आवड।**
**दुग्धाची चाड काय तया ॥१००॥**
**पहा दर्दुर आणि भ्रमर । कमळ सुंदर दोघांचें घर ।**
**परी परागीं भ्रमरा विहार ।**
**दर्दुरा आहार चिखलाचा ॥१०१॥**

- अध्याय ५०

(६) बाबांच्या उपदेश करण्याच्या पद्धतीचे वर्णन करून सांगताना हेमाडपंत वैद्य व मुलाची आई यांचे दृष्टांत किती यथार्थपणे देतात !

**वैद्य जाणे रोगाचें निदान । तयास ठावा मात्रेचा गुण ।**
**रोग्यास नाहीं त्याची जाण ।**
**आधीं आण गूळ म्हणे ॥२६॥**
**गूळ गोड परी अपकारी । रोगी तदर्थचि हट्ट धरी ।**
**घेई न वाटी औषधाची करीं ।**
**गूळ करावरी न ठेवितां ॥२७॥**
**चाले न रूग्णावरी सक्ती । वैद्य तेव्हां युक्ति योजिती ।**
**आधीं गूळ मग औषध देती ।**
**परी साधिती निजकार्य ॥२८॥**
**मात्र अनुपान तेवढें बदलती । जेणें गुळाचे दोष हरपती ।**
**योजिलीं औषधें कार्यक्षम होती ।**
**तेच कीं रीती बाबांची ॥२९॥**

- अध्याय २७

**बाळ मागतां गोडधड्ड । माता पाजी बोळकडू ।**
**बाळ तडफडू वा रडू । प्रेमनिवाडू हा ऐसा ॥६१॥**
**बोळाचा तो कडूपणा । योग्य काळें चढणार गुणा ।**
**बाळ काय जाणे त्या लक्षणा ।**
**मातेच्या खुणा मातेस ॥६२॥**

- अध्याय २५

**काय आहे रोग पोटीं । हे काय आहे बाळास दृष्टी ।**
**मातेस पाजावी लागे गुटी । जरी तें हट्टी पिईना ॥१५०॥**
**कधीं अंजारून गोंजारून । कधीं नेत्र पिंजारून ।**
**कधीं चतुर्दधरत्नप्रयोजन ।**
**कधीं आलिंगन सप्रेम ॥१५१॥**

- अध्याय १७

(७) संसारात आसक्त असलेल्या जीवाचे व नंतर ईश्वरकृपेने गुरूची प्राप्ती झाल्यावर त्याच्या मुक्तीचे वर्णन करताना पिंजऱ्यातील पोपटाचा दृष्टांत किती सुंदर आहे !

**जीवाशुकाची एकचि परी । एक देहीं दुजा पंजरीं ।**
**मुकला शुक स्वातंत्र्या तरी ।**





मानी ती बरी परतंत्रता ॥२३॥
काय मौजेचा माझा पिंजरा । सुवर्णदांडीच्या येरझारा ।
उलट टांगलों तरी मी बरा । पाय न जराही सुटावा ॥२५॥
बाहेर मग या सुखा आंचवणें ।
नाहीं मग डाळिंबाचे दाणे ।
नाहीं या गोड मिरचीचें खाणें ।
स्वसुखा नागवणें स्वयेंच ॥२६॥
परी येतां शुकाच घटी । भेटे तयास अघटित घटी ।
मारी तयास प्रेमें थापटी । घाली दृष्टींत अंजन ॥२७॥
त्या थापटीच्या शक्तिपातें । निसटला उघडिलीं नेत्रपातें ।
विहरूं लागला पक्षवातें । कोण मग त्यातें आवरी ॥२८॥
जग अफाट तया उघडलें ।
यथेच्छ डाळिंबी पेरूचे मळे ।
गगन स्वच्छंद विहारा मोकळें ।
स्वातंत्र्यसोहळे मग भोगी ॥२९॥

- अध्याय २३

(८) शेवटी इंद्रियसुखापासून होणाऱ्या हानीचे वर्णन करताना 'स्थावर जलचर पंखी' यांचा अगदी परिणामकारक दृष्टांत पहा :

शब्दस्पर्शरूपादिक । पंचविषयीं जें जें सुख ।
तें तें अंती सकळ असुख । परम दु:ख अज्ञान ॥८९॥
शब्दविषया भुले हरिण । अंती वेंची आपुला प्राण ।
स्पर्शविषया सेवी वारण । साहे आकर्षण अंकुशें ॥९०॥
रूपाविषयी भुले पतंग । जाळूनि निमे आपुलें अंग ।
मीन भोगी रसविषयोभोग । मुके सवेग प्राणास ॥९१॥
गंधालागीं होऊनि गुंग । कमलकोशीं पडे भृंग ।
एकेका पायीं इतुका प्रसंग । पाचांचा संघ भयंकर ॥९२॥
हों तों स्थावर जलचर पंखी ।
ययांची दु:स्थिती देखोदेखी ।
ज्ञाते मानवही विषयोन्मुखी ।
अज्ञान आणखी तें काय ॥९३॥

- अध्याय ३९

## रूपक

रूपकसुद्धा उपमा व दृष्टांतासारखेच दोन गोष्टींत साम्य दर्शविणारे असते. परंतु ते उपमेयाला म्हणजे ज्याला उपमा दिली जाते त्या वस्तूला ते झाकून टाकते. हेमाडपंतांची बरीचशी रूपके गुरु, संसार, ज्ञान, भक्ती वगैरेंसारख्या अध्यात्मिक विषयांवर असल्याने त्यात भारदस्त शब्दांचा भरपूर वापर आढळतो. परंतु एकदा का त्यांचा भावार्थ नीट समजून घेतला की त्या रूपकाचे शब्दसौंदर्य व यथार्थता पाहून मन प्रसन्न होते. उदा.

(१) न करितां स्नेहाची रांगोळी ।
अज्ञानतमाची काजळी ।
'मी मम्' या वातीची होळी ।
ज्ञान न पाजळी निजप्रभा ॥७०॥

- अध्याय ८

(२) मनाचे मळे जैं भक्तीं शिंपिलें ।
वैराग्य खुले ज्ञान फुले ।
कैवल्य फळे चित्सुख उफळे ।
अचूक चुकलें जन्ममरण ॥१८॥

- अध्याय ६

(३) तो हा परात्परसरोवरहंस । हंस:सोहंवृत्ति-उदास ।
ब्रह्म-मुक्तसेवनोल्लास । असमसाहस जयास ॥७॥

- अध्याय ३६

(४) आता श्रीमद्भागवत पुराणाचे सार कसे काढले गेले व त्यातील अकराव्या स्कंधाचे म्हणजे एकनाथी भागवताचे कै. काकासाहेब दीक्षित नित्य वाचन करीत असतात हे सांगताना हेमाडपंत शेतातील पीक काढून मळण्याचे किती सुंदर रूपक वापरतात ते पहा :

जगदुद्धाराचिया कारणें । ब्रह्म्याठायीं जें नारायणें ।
पेरिलें तें मग नारद-क्षेत्रीं त्यानें ।
बीज आणिलें कणसासी ॥८२॥
जया क्षेत्राची दशलक्षणी । केली संवगणी बादरायणीं ।
शुकें परीक्षितीच्या खळ्यांत मळणी ।
केली निवडणी कणसांची ॥८३॥
स्वामी श्रीधरें मारलें हडप । स्वामीजनार्दनें केलें माप ।
रसभरित पक्वान्नें उमाप । नाथप्रताप भोजन ॥८४॥

- अध्याय १८

(५) कठोपनिषदातील शरीररूपी रथाचे रूपक तर एकदा नाही तर तीनदा (अ. १७,३९ व ४९) आलेले आहे. अध्याय १७ तील अगदी प्रभावितपणे वर्णिलेले रूपक पहा:

या निजशरीराच्या रथीं । निजबुद्धीस करीं सारथी ।
स्वयें स्वामी बैस रथी । स्वस्थचित्त ऐस तूं ॥३०॥
दुर्गमरूप रसमार्गराजी । कंठावया मग सारथी योजी ।
आवरी मन:प्रग्रहांमाजी । दशेंद्रियवाजी उच्छृंखळ ॥३१॥

घोडे जरी सैरा धांवती। लगाम राखील स्थानावरती।
तो निरवून सारथिया हातीं। स्वस्थचित्तीं बैसें तूं ॥३२॥
सारथी कुशल आणि निपुण।
तरीच घोडे चालती करून।
तोच मन:प्रग्रहपराधीन। होतां बलहीन होतसे ॥३३॥
विवेकबुद्धिचें सारथ्य जेथ।
तो समनस्क समाहितचित्त।
तयासीच परमपद प्राप्त। इतर मार्गांत थकतात ॥३४॥

- अध्याय १७

(६) आता दुस्तर संसारसागराचे वर्णन पहा:

परम दुस्तर भवसागर। उसळती मोहाच्या लाटा अनिवार।
आदळती अविचार – तटावर।
पाडिती तरुवर धैर्याचे ॥३२॥
वाजतो अहंकाराचा वारा। तेणें हा डहुळे सागर सारा।
क्रोधद्वेषादि महामगरां। मिळे जैं थारा निर्भयपणें ॥३३॥
'मी माझें' हा मगर। वासना विकल्प भंवरे अपार।
निंदा – असूयादि जेथें तिरस्कार।
असंख्य जलचर तळपती ॥३४॥
ऐसा जरी हा सागर भयंकर। अगस्तिरूपें प्राशी गुरुवर।
तयांचे जे चरणरजकिंकर।
तयां न लवमात्र भय त्यांचे ॥३५॥

- अध्याय ५२

(७) आणि 'जन्ममरणशोकाकुलित' संसाररूपी वृक्षाचे वर्णन पहा:

तो हा दृष्ट नष्टस्वरूप। ऊर्ध्वमूळ संसारविटप।
जयाचा अपार शाखाव्याप।
नाकळे अल्पल्पही कवणा ॥२०॥
क्षणामागें क्षण लोटे। तैसा हा पसरे फुटती फाटे।
कधीं दुरून रमणीय वाटे।
आलिंगितां कांटे सर्वांगी ॥२१॥
अनर्थात्मक हा ठायींचा। अविद्येपोटीं जन्म याचा।
ईषणातृष्णादि पाणियाचा।
सांठा तयाच्या सभोंवतीं ॥२४॥

- अध्याय ३२

(८) ज्ञानयज्ञाचे रूपक तर किती बारकाईने व यथार्थपणे रचले आहे!

आतां ज्ञानयज्ञाचें स्वरूप।
''अहं ब्रह्मास्मि'' जेथील यूप।
पंचमहाभूतें यज्ञमंडप। जीवेश्वरभेद पशु तेथें ॥१२१॥
पंच इंद्रिये पंच प्राण। हेंच यज्ञाचें उपचारभरण।
मनबुद्धीचिया कुंडांमधून।
प्रदीप्तीकरण ज्ञानाग्नीचें ॥१२२॥
यज्ञकर्ता जीव यजमान। करी अज्ञानघृतावदान।
आत्मानंदरसीं निमग्न। अवभृथस्नान जीवा घडे ॥१२३॥

- अध्याय ५०

(९) शेवटी ''राजाधिराज चक्रवती'' गुरू महाराजांच्या रूपकाला हेमाडपंतांच्या अनन्य गुरूभक्तीमुळे आणि अतिश्रेष्ठ कवित्वामुळे एवढे वैभव प्राप्त झाले आहे की वाचकभक्त आश्चर्यचकित होऊन त्या स्वानंदसम्राटाला लोटांगणच घालतात:

राजाधिराज चक्रवर्ती। शांतिसिंहासनस्थ मूर्ति।
नमूं स्वानंदसाम्राज्यपति। अनन्यगतीं गुरूराज: ॥१॥
अभेदभक्ति सहसस्थिति। उभयभागीं चवऱ्या वारिती।
स्वानुभूति सद्य: प्रतीति। जया वीजिती अत्यादरें ॥२॥
छत्रधारी स्वात्मस्थिति। वेत्रधारी शांतिसंवित्ति।
षडरि मायामोहवृत्ति। जेथें न तगती क्षणभरी ॥३॥
काय या सभेचा थाट। चार सहा अठरा भाट।
चिन्मयचांदवा लखलखाट।
पसरला घनदाट स्वानंद ॥४॥

- अध्याय १६

## विरोधाभास

विरोधाभास म्हणजे दोन विरूद्ध गुण एकत्र दाखविणे. यांच्या वापराने वर्णन चांगले रंगते. उदा.

(१) कफनी ठिगळ्यांची जयाचें वसन।
तरट जयाचें आसनास्तरण।
वृत्तिशून्य जयाचें मन।
रौप्यसिंहासन काय त्या ॥११०॥

- अध्याय १०

(२) जयाची भ्रूविक्षेपलहरी। क्षणांत रंकाचा राव करी।
तो हा घेऊनि चौपालवी करीं।
दारोदारी हिंडतसे ॥९१॥

- अध्याय ८





(३) पूर्वजन्मींचा महापापिष्ट । सर्वांगीं भरलें रक्तकुष्ट ।
भागोजी शिंदा महाव्याधिष्ट ।
परी भक्त वरिष्ठ बाबांचा ॥९८॥

- अध्याय ७

(४) त्वचा मांस रूधिर स्नायू ।
मेद मज्जा अस्थि वायू ।
अमंगल अंगे उपस्थ पायू ।
ते अल्पायु हे काया ॥२३॥
ऐसा अमंगल आणि नश्वर । नरदेह जरी क्षणभंगुर ।
तरी मंगलधाम श्रीपरमेश्वर ।
हातीं येणार एणेंचि ॥२४॥

- अध्याय ८

उत्प्रेक्षामध्ये कवीच्या कल्पनांच्या भरारी असतात; आणि त्यासाठी 'जणूकाय' शब्द वापरतात :

(१) बाबांची चिलिम ती किती यत्किंचित वस्तू ! परंतु तिच्या सेवेचा खरेपणा आणि भाग्याचा थोरपणा कवीने किती सुंदर तऱ्हेनें कल्पिला आहे !

धन्य ती निर्जीव वस्तु परी ।
काय तिचिया भाग्याची थोरी ।
आम्हां सजीवां न तिची सरी ।
सेवा ती खरी तियेची ॥१९९॥
तपश्चर्या ही महाकठिण । लाथां तुडविलें बाळकपण ।
पुढें सोसूनि शीतोष्णतपन ।
अग्नींत तावून निघाली ॥२००॥
भाग्यें बाबांचे करस्पर्शन । पुनश्च धुनीमाजीं भर्जन ।
मागुती गैरिका उटी चर्चन । मुखचुंबन तैं लाधे ॥२०१॥

- अध्याय ३७

(२) प्राणोत्क्रमण जवळ आल्यावर बाबांनी लक्ष्मीला नऊ रुपये दान दिले त्याबद्दलची कवीची कल्पना पहा :

कीं ही नवविधा –भक्तीची खूण ।
किंवा नवरात्र–अंबिकापूजन ।
झालें आज आहे शिलंगण ।
सीमोल्लंघन–दक्षिणा ही ॥१२०॥
किंवा श्रीमद्भगवतीं । श्रीकृष्णें कथिली उद्धवाप्रती ।
ती नवलक्षण शिष्यस्थिती ।
तियेची स्मृती देत बाबा ॥१२१॥
एकादशाच्या दशमाध्यायीं ।
षष्ठम श्लोकाची पहा नवलाई ।
शिष्ये कैसी करावी कमाई ।
कवण्या उपायीं वर्तावें ॥१२२॥

- अध्याय ४२

(३) संतांचे वर्णन करताना त्यांच्या श्रेष्ठत्वाची तुलना हेमाडपंत समुद्र पिऊन टाकणाऱ्या अगस्त ऋषींशी आणि अंध:कार घालविणाऱ्या सूर्याशी कल्पना करून करतात :

भवसागराचे हे अगस्ति । अज्ञानमताचे हे गभस्ति ।
परमात्म्याची एथेंच वस्ती । वस्तुत: हे तदभिन्न ॥७॥

- अध्याय १२

(४) शेवटी बाबा आपल्याला सोडून का गेले याबद्दल शोकाकुल कवीची त्यांना उद्देशून कल्पना पहा :

कानीं कपाळीं ओरड करितां ।
कंठासि तुमचे कोरड पडतां ।
कंटाळलां वाटतें चित्ता ।
आमुची उदासता देखोनि ॥११४॥
म्हणोनि आम्हांवरी रुसलां । पूर्वप्रेम सारें विसरलां ।
कीं ऋणानुबंधचि आजि सरला ।
कीं ओसरला स्नेहपान्हा ॥११५॥

- अध्याय ४३

अतिशयोक्तीत थोडे वाजवीपेक्षा जास्त फुगवून वर्णन असते. यामागे कधी यमक जुळविण्याचा तर कधी ते वर्णन किंवा विचार श्रोत्यांच्या मनावर पक्का ठसविण्याचा उद्देश असतो;

(१) येतां कोणीही दर्शनासी ।
लागतां चरण वंदावयासी ।
असो हिंदू यवन वा पारसी ।
दक्षिणा त्यापासीं मागत ॥९०॥
तर तरी काय थोडी थोडकी ।
रुपये एक दोन वा पंचकडी ।





मागत शत सहस्त्र लक्ष कोडी।
स्वेच्छा परवडी दक्षिणा ॥९१॥

- अध्याय १४

बाबांनी कधी कोणाकडून हजार, लक्ष किंवा कोटी रुपयांची दक्षिणा मागितली नव्हती. तेव्हा लहर लागली तर मनाला वाटेल तेवढी बरीच दक्षिणा बाबा मागत असत असाच कवीचा उद्देश आपण येथे समजावयाचा. असो.

(२) आता गयावळाच्या मनमाड व पुणतांबे स्टेशनवरच्या पगारदार नोकरांची संख्या पहा, किती भरमसाट ! पण आपण 'पुष्कळ' असाच अर्थ घ्यावयाचा असतो.

एक ना दोनतीनशें नोकर। गयावळाचे पगारदार।
मनमाड आणि पुणतांब्यावर।
यात्रा सविस्तर नोंदीत ॥७६॥

- अध्याय ४६

व्यतिरेक म्हणजे एखाद्या गुणाबाबतीत ज्याच्याशी तुलना केली असेल (उपमान) त्यापेक्षाही ज्याची तुलना केली असेल (उपमेय) ती वस्तू श्रेष्ठ दाखविणे. उदाहरणार्थ खालील ओवीत श्री साईसत्‌चरिताच्या गोडीची अमृताशी तुलना करून मग त्या श्री साईसत्‌चरिताचा 'जन्मनिवार' हा विशेष गुण दाखवून त्याला अमृतापेक्षा श्रेष्ठ दाखविले आहे :

(१) पाहूं अमृताची उपमा देऊन।
परी अमृत काय गोड याहून।
अमृत करील प्राणरक्षण।
जन्मनिवारण चरित्र हें ॥२२॥

- अध्याय १३

तशीच व्यतिरेकाची आणखी काही उदाहरणे पहा :

(२) चिंतामणि प्रसन्न होतां।
लौकिकसौख्य चढेल हाता।
लाधेल स्वर्गसंपत्तिमत्ता। महेंद्र होतां प्रसन्न ॥५०॥
याहूनि गुरूची अलौकिकता।
गुरुसमान नाहीं दाता।
दुर्लभ ब्रह्म दावितील भक्ता।
सुप्रसन्नता पावलिया ॥५१॥

- अध्याय १६

चिंतिलेंचि दे चिंतामणी।
कल्पवृक्ष दे कल्पिलें मनीं।
कामधेनु ते कामप्रसविणी।
अचिंत्यदानी गुरुमाय ॥१०५॥

- अध्याय ४०

(४) भारतीं संवाद कृष्णार्जुनांचा।
त्याहूनि सरस हा कृष्णोद्धवांचा॥
तो या भागवतीं उपदेश साचा।
प्रेमळ वाचा नाथांची ॥९३॥

- अध्याय १८

(५) जें सुख विरक्ता एकांतीं।
कीं जें भक्ता करितां भक्ति।
असो इंद्र कीं चक्रवर्ती।
न मिळे कल्पांती तयांना ॥१०२॥

- अध्याय ३७

अन्योक्ति म्हणजे दुसऱ्याला उद्देशून बोलून आपले मत व्यक्त करणे संसारात आसक्त असलेल्या जीवांचे पिंजऱ्यातील शुकाचा म्हणजे पोपटाचा दृष्टांत देऊन हेमाडपंतांनी केलेल वर्णन आपण मागे दृष्टांत या सदराखाली वाचलेच आहे. त्या सुंदर अलंकाराचा पुन्हा वापर करावासा वाटल्यावरून हेमाडपंत पुनरावृत्ती टाळण्यासाठी अलंकाराचा उत्प्रेक्षा अलंकाराचा उपयोग करतात :

स्वयेंच जीवास करावा बोध।
कीं तूंच आहेस ब्रह्म शुद्ध।
झालासि देहसंगे बद्ध। नलिकापिनद्ध शुक जैसा ॥१२४॥
भुललासि केवळ मोहमाये। तेणें विसरलासि निजसोये।
तुझा तूच सावध होयें। स्वरूपा ये झडकरी ॥१२५॥
भ्रमामुळे वाढला भ्रम। देहाभिमानादि संभ्रम।
मृगजलसम हें 'मी मम'। जाणूनि निर्मम होईं कां ॥१२६॥
या मी–तूंपणाचे प्रपंची। गुंतावें कां नीट विवंची।
सोड आवळले पाय पंची। उड्डाणे उंची विहर कीं ॥१२७॥

- अध्याय १७

## रसपरिपोष

रस नऊ आहेत. ते म्हणजे शृंगार, वीर, करुण, हास्य, रौद्र, भयानक, बिभत्स, अद्भुत आणि शांत. उत्तम काव्यात यातील बरेचसे रस





आलटून पालटून आढळतात आणि काव्याला रंग आणतात.

श्री साईसत्चरित हा एका थोर संताचा चरित्रग्रंथ आहे. त्यामुळ शृंगार, वीर व भयानक रसांना अर्थातच वाव नाही. तरीपण हास्य, रौद्र, भयानक, बिभत्स, अद्भूत व शांत हे मात्र ठिकठिकाणी भरपूर आढळतात:

साईबाबांचे चरित्र अनेक चमत्कारांनी भरलेले असल्याने साहजिकच अद्भूत रस येणारच.

(१) मशिदीच्या जोत्यावरील ।
बाबा उचलूनि घेती टमरेल ।
त्यांत होतें इवलेंसे तेल ।
कष्टें लागेल सांजवात ॥१०८॥
त्या तेलांत घातलें पाणी ।
स्वयें बाबा गेले पिऊनी ।
ऐसें तें ब्रह्मार्पण करूनी ।
निव्वळ पाणी घेतलें ॥१०९॥
मग तें पाणी पणत्यांत ओतुनी ।
सुके कांकडे पूर्ण भिजवुनी ।
~~तयांसी कांडे ओढूनि लावुनी ।~~
दीप पेटवूनि दाविले ॥११०॥

अध्याय ५

(२) एकदा पर्वविशेष जाणून
करावें प्रयागतीर्थी स्नान ।
दासगणूचें जाहलें मन ।
आले आज्ञापन घ्यावया ॥१०२॥
बाबा देती प्रत्युत्तर ।
नलगे तदर्थ जाणें दूर ।
हेंचि आपुले प्रयागतीर ।
विश्वास धर दृढ मनीं ॥१०३॥
खरेंचि सांगावे काय कौतूक ।
बाबांचे चरणीं टेवितां मस्तक ।
उभयांगुष्ठीं निथळलें उदक ।
गंगायमुनोदक पाझरलें ॥१०४॥

- अध्याय ४

(३) अजा मारितां तिची आंतडी ।
बाह्याभ्यंतर करूनि उघडी ।
धुऊनि घालिती घडीवर घडी ।
निर्मळ चोखडी करितात ॥५७॥
तैसीच आपुली आंतडी काढूनी ।
आंतून बाहेर स्वच्छ धुऊनी ।
पसरली जांबाचे झाडावरूनी ।
आश्चर्य जनीं बहु केलें ॥५८॥

- अध्याय ७

(४) चौहाती लांब लाकडी फळी ।
रुंद एक वीतचि सगळी ।
झोपाळ्यापरी आढ्यास टांगली ।
चिंध्यांहीं बांधिली उभयाग्रिं ॥१५॥
ऐशा फळीवरी बाबा निजत ।
उशापायथ्या पणत्या जळत ।
केव्हां चढत केव्हां उतरत ।
अलक्ष्य गति तयांची ॥१६॥

- अध्याय १०

(५) हंडींतूनि येतां वर । वाफा उसळत असतां भयंकर ।
अस्तनी सारूनी बाबा निजकर।
घालूनि खालवर ढवळीत ॥८१॥
कोठें रक्तमासांचा हात ।
~~कोठें तपेलें प्रखर रखरखीत ।~~
परी न भाजल्याची खूण यत्किंचित ।
न भयभीत मुखचर्या ॥८३॥

- अध्याय ३८

यात विनोद, चेष्टा, विडंबन, टिंगली वगैरे असते. बाबा 'विनोदाचे आगर' च असल्याने या रसाला या ग्रंथात भरपूर वाव मिळाला आहे :

(१) आणीक वाटलें बाबांचे जीवा ।
मिरीकरांते प्रश्न पुसावा ।
ठावा का तुज लांब बावा ।
आणीक नवलावा तयाचा ॥५२॥
मग मूठ वळूनि डावा हात ।
कोपरापाशीं उजवे हातांत ।
धरूनि फिरवीत मुखें वदत ।
ऐसा भयंकर असतो तो ॥५३॥

- अध्याय २२





(२) पुढे जातां बाबांचे दर्शना।
नवल बाबा पुसती तयांना।
"विठ्ठलपाटील आला होता ना ?।
भेट झालीना तयाची ॥९०॥
मोठा पळपुट्या बरें तो विठ्ठल।
मेख मारूनि करीं त्या अढळ।
दृष्टि चुकवूनि काढील पळ।
होतां पळ एक दुर्लक्ष" ॥९१॥

- अध्याय ४

अशा प्रकारे बाबा स्वतःच विनोद करीत असल्यावर त्यांच्या शामाला कोठली अडचण ! अध्याय ३६ मध्ये सोलापूरच्या सखाराम औरंगाबादकराच्या पुत्रप्राप्तीसाठी आतुर असलेल्या पत्नीची बाबांशी भेट करून देताना तर शाम्याच्या विनोदाला उधाणच येते :

(३) साई आपुले हस्त धूतां। माधवराव वस्त्रानें पुसतां।
आनंदवृत्तीमध्यें असतां।
ते काय करितात पहावें ॥१३६॥
प्रेमोल्हासें माधवरावांचा।
बाबा तंव घेती गालगुच्चा।
म्हणती शामा हा काय म्हणतो।
नारळ फारचि रे गुडगुडतो।
शामा मग ती संधी साधतो।
काय वदतो बाबांस ॥१४७॥
माझिये पोटीं असेंच गुडगुडो।
बाई ही मनीं म्हणे तें घडो।
बाई तुज आजपासून। बारामहिने नव्हतां पूर्ण।
जाहलें नाहीं पोटीं संतान।
काय मी करीन तें परिस ॥१५६॥
'ऐसाच नारळ डोकींत घालून।
या देवाला मशिदीमधून।
मी न जरी लावीं काढून।
तरी न म्हणवीन माधव' ॥१५७॥

-अध्याय ३६

अध्याय २४ तर संपूर्ण शब्दविनोदाच्या वर्णनाने भरलेला आहे.

(४) काकाही होते तेथेंच बैसले।
तितक्यांत माधवराव हंसले।
कां अण्णासाहेब हे तेथें कसले।
दाणे हे डसले दिसताती।
ऐसे म्हणूनि कोटाची अस्तनी।
बोटानें स्पर्शतां माधवरावांनी।
कोटाचिया वळियांमधूनि।
दाणे वरूनि आढळले ॥२३॥
कोठून फुटाणे तेथें आले।
वळियांवरी कैसे स्थिरावले।
जे ते आश्चर्य करून राहिले।
मग बाबा वदले तें परिसा ॥३०॥
म्हणती "याला वाईट खोडी।
एकेकटें खाण्याची गोडी।
आजा बाजाराची साधूनि घडी।
फुटाणे रगडीत हा आला" ॥३३॥
पाहूनियां ऐसी संधी। मावशीबाई मोठी विनोदी।
म्हणे काय हो अण्णा नादी।
मुका आधीं मागे मज ॥११५॥
पिकल्या केसांची लाज नाहीं।
घेतोस माझा मुका पाहीं।
ऐसें वदतां मावशीबाई।
अण्णा बाही सरसावी ॥११६॥
म्हणे मी इतुका थेरडा।
मी काय मूर्ख अगदींच वेडा।
तूंच तोंड लावूनी तोंडा।
सजलीस भांडाया मजपाशीं ॥११७॥

- अध्याय २४

आणि मग स्वत: हेमाडपंतही मधून मधून विनोदी वाक्प्रचार वापरतात. उदा. :

(५) कोणी एक लोभी जन। पुसेल साईसी ब्रह्मज्ञान।
तें तयाचेच खिांतून।
देतील काढून महाराज ॥११२॥

- अध्याय १५

क्षीण होतां इंद्रियशक्ति।
जगांत कोणी मान न देती।
तैं रिकामटेकडे उमाच बैसती।
सूत कातिती ब्रह्माचें ॥३१॥

- अध्याय १६





झालें, अण्णा स्वस्थ बैसले ।
होतें जयांचे कर्म ओढवलें ।
तेच त्या स्नेह्याचे पातीदार झाले ।
आलें तपेलें गळ्यांत ॥८०॥
करावया गेले सट्टा । परी तयांचा दिवस उलटा ।
ठोकर लागता झाला तोटा ।
कैसा सोटा फकीराचा ॥८१॥

- अध्याय २५

रौद्र म्हणजे अतिशय क्रोध. बाबांच्या क्रोधाची वर्णने श्री साईसतचरितात कितीतरी सापडतील :

(१) मशिदीच्या समोरच्या अंगणात सभामंडप बांधण्यासाठी खांब रोवण्याचे चालू असताना बाबांचा तात्या पाटलावरचा राग पहा :

एकदां अत्यंत कोपायमान ।एका हातीं तात्यांची मान ।
दुजियाने एका खांबास हालवून ।
उपटून काढूं पहात ॥१३४॥
हाल हालवूनि केला ढिला ।
तात्यांचे माथ्याचा फेटा काढिला ।
कांडें लावून पेटवूनि दिला ।
खड्ड्यांत टाकिला त्वेषानें ॥१३५॥
तया समर्थीचे ते डोळे । दिसत जैसे अनल गोळे ।
सन्मुख पाहील कोण त्यावेळे ।
धैर्य गेलें सकळांचे ॥१३६॥

- अध्याय ६

(२) कल्याणच्या हाजी सिद्दीक फाळकेवर बाबा एकाएकी खवळले ते पहा:

कोळंबा आणि पाण्याच्या घागरी ।
स्वयें उचलनि भिरकाविल्या द्वारीं ।
हात चावोनियां करकरी ।
आले शेजारीं हाजीच्या ॥१०६॥
धरूनि आपुली कफनी दों करीं ।
हाजीसन्मुख उचलूनि वरी ।
म्हणती ''तू काय समजलास अंतरीं ।
करिसी फुशारी मजपुढें ॥१०७॥
बुड्ढेपणाचा तोरा दाविसी ।
एसेंचि काय तूं कुराण पढसी ।
मक्का केल्याचाताठा वाहसी ।
परी न जाणसी तूं मातें '' ॥१०८॥

- अध्याय ११

(३) बाबांना आपली सेवा करणाऱ्याला कोणी टोकलेल आवडत नसे. अशाच प्रसंगी त्यांचा नरसिंव्हावतार पहा :

कानीं पडता इतकीं अक्षरें । बाबा स्थानावरूनि सत्वरें ।
घेऊनि आपला सटका निजकरें ।
भूमि प्रहारें ताडिली ॥१२७॥
चढली वृत्ति दुर्धर क्षोभा । समोर कोण राहील उभा ।
नेत्र खदिरांगार-प्रभा । फिरती सभोंवार जैं ॥१२८॥
अंधारीं मार्जाराची बुबुळें । तेवीं चमकती दिवसा डोळे ।
वाटे नयनींचिया ज्वाळे ।
आतांच जाळितील सृष्टी ॥१२९॥

- अध्याय २४

(४) आता डहाणूच्या मामलेदार देवांवरचे बाबांचे कडकडणे ऐका :

मग भ्रकुटीस घालूनि आंकडे । पाहूनियां इकडे तिकडे ।
म्हणे तूंच लबाड होसी । तुजवीण कोण ये समयासी ।
येईल चिंधी चोरावयासी ।
चोर मी तुजसीच समजतों ॥११६॥
तुला कुऱ्हाडीनें हाणीन ।
तुला कापीन, ठार करीन ।
जाशील कोठें माझिया हातून।
येईन मारीन तेथें तुज ॥११८॥
क्रोधें लाल झाले साई ।
उद्धारियेली आई माई ।
शिव्या-शापांची लागली रयी ।
संतापें लाही जाहली ॥१२०॥

- अध्याय ४१

अशी रौद्र रसाची कितीतरी सुंदर उदाहरणे देता येतील. परंतु साईबाबा ''जरी क्रोधें कांपले थरथरां । डोळे जरी फिरविले गरगरां । तरी पोटीं कारुण्याचा झरा । माता लेंकुरा तैसा हा ।।'' आणि ''साई





"बाह्यक्रोधाभिभूत। अंतरी ते नित्य मुदित॥'' असल्याने लगच शात हात आणि मग शांत रसाचा प्रवाह सुरू होई.

(१) म्हणतां म्हणता क्रोधही क्षीण।
झाला शमन बाबांचा ॥१४२॥
तात्काळ दुकानदार बोलविला।
जरीकांठी फेंटा आणविला।
स्वयें तात्याचे डोक्यास वांधविला।
शिरपाव दिधला जणूं त्यास ॥१४३॥

\- अध्याय ६

(२) तैसेचि तात्काळ मागें परतले।
पुन्हां त्या फाळक्यापांशी गेले।
रुपये पंचावन्न खिशांतूनि काढिले।
हालावर मोजिले तयाचे ॥१११॥
तेथूनि पुढें मग प्रेम जडलें।
हाजीस जेवावया निमंत्रिलें।
दोघेही जणू अवघें विसरले।
हाजी समरसले निजरंगी ॥११२॥

\- अध्याय ११

(३) असो देवास आली करुणा।
शान्तता उद्भवली साईंचे मना।
सोडूनियां ते भयप्रद कल्पना।
येऊनि आना बैसती ॥१३७॥

\- अध्याय २४

(४) देवही मग तेथें आले। इतरांमाजीं जाऊ बैसले।
म्हाताऱ्याचिया जीवा लागलें।
असेल मग बोले श्री साई ॥१३०॥
''चिंधीची ती कथा काय।
तरी म्यां दुरुक्तीं केलें घाय।
होती चोरिली त्या काय उपाय।
बोलल्याशिवाय रहावेना ॥१३१॥
असो अल्लासारें वधील। तोही तयाचें बरें करील।
तंव एं भाऊ दक्षिणा देसील''।
पुसती क्षमाशील श्रीसाई ॥१३२॥

\- अध्याय ४१

शिवाय हा ग्रंथ भक्तिसाराने ओथबलेला असल्याने 'शांतरसाला तोटाच कुठला !

(५) वदनीं श्रीसाईंचे नाम। अंतरीं श्री साईंचें प्रेम।
ज्याचें साईप्रीत्यर्थ कर्म।
ऋणाईत परम त्या साई ॥२४॥
तुटावया संसारबंधन। याहूनि नाहीं अन्य साधन।
साईकथा परम पावन। सदा सेवन सुखदायी ॥२५॥
पायीं साईसी प्रदक्षिण।
करा श्रवणीं सच्चरितश्रवण।
सर्वांगी द्या प्रेमालिंगन।
डोळं घ्या दर्शन साईचें ॥२६॥
साष्टांगी यावें लोटांगणी।
मस्तक ठेवावें तया चरणीं।
जिव्हा लावावी तन्नामस्मरणीं।
नासिकें अवघ्राणी निर्माल्य ॥२७॥

\- अध्याय ४९

साई महाराज म्हणजे दयेचे सागर व करुणेचे निधान, मग करुण रस असणारच.

(१) नारायणगावच्या भीमजी पाटीलाच्या कफक्षयाच्या यातनांचे वर्णन पहा :

येऊं लागला असह्य खोकला।
ज्वरही फार वाढूं लागला।
दिवसेंदिवस बळावत गेला।
निराश झाला भीमजी ॥३५॥
तोंडास फेंस सर्वदा येणें।
मचूळ आणि रक्ताचे गुळणे।
पोटांत अक्षयी कळमळणें। जीव तगमगणें राहीना ॥३६॥
शेजे खिळिला दुखणाईत।
गळालीं गात्रें चालला वाळत।
उपायांची झाली शिकस्त। झाला तो त्रस्त अत्यंत ॥३७॥
अन्नपान कांही न रुचे। पेजपथ्य कांही न पचे।
तेंणे अस्वस्थ कांही न सुचे। हाल जिवाचे असह्य ॥३८॥
देवदेवस्की झाली सारी। हात टेकिले वैद्य-डॉक्टरीं।

पाणी सोडिलें जीविताशेवरी ।
पडला विचारीं भीमाजी ॥३९॥

- अध्याय १३

(२) साईबाबांच्या निर्याणानंतरच्या शिरडीजनांच्या व इतर भक्तजनांच्या शोकाचे वर्णन तर अत्यंत प्रभावित आहे. हेमाडपंत त्यासाठी ७० ओव्या खर्च करतात. त्याची थोडीशी झलक पहा :

**असो पडलें बाबांचे शरीर । कोसळला दु:खाचा डोंगर ।**
**हाहाकार शिरडीभर । एकचि कहर उसळला ॥८२॥**
**ऐकूनि बाबांचे निर्याण । वार्ता खोंचली जैसा बाण ।**
**पडलें नित्य व्यवसाया खाण । दाणादाण उडाली ॥८३॥**
**पसरतां ती अमंगल मात । सकळांसी गमला वज्राघात ।**
**विचारी बैसले निवांत । इतरीं आकांत मांडिला ॥८४॥**
**अति आवडीचेनि पडिभारें । कंठ तयांचा दाटे गहिंवरें ।**
**दु:खाश्रुनीर नयनीं पाझरे । 'शिव शिव हरे' उद्गारले ॥८५॥**
**घरोघरीं झाली हडबड । उडाली एकचि गडबड ।**
**छातींत भरली धडधड । लोक दडदड धांविन्नले ॥८६॥**
**शिरडी झाली कलाहीन । मृतप्राय ही दीन ।**
**जीवनेंवीण जेवी मीन । तेवीं जन तळमळती ॥९८॥**
**वार्जितां कांता निज-भ्रतारें ।**
**अथवा माता स्तनींची पोरें ।**
**जैसीं गाईचीं चुकलीं वासरें । लहान थोरें त्यापरी ॥९९॥**
**अनिवार हे दु:खावस्था ।**
**झाली शिरडीच्या जनां समस्तां ।**
**बिदोबिदीं अस्तावेस्ता । जन चौरस्ता धांवती ॥१००॥**
**कोणी करी आक्रंदन । कोणी तेथें घेई लोळण ।**
**कोणी पडे मूर्च्छापन्न । दु:खापन्न जन झाले ॥१०२॥**
**दु:खारूंनी स्त्रवती नयन । नरनारी अति उद्विग्न ।**
**टाकोनियां अन्नपान । दीनवदन तीं झालीं ॥१०३॥**

- अध्याय ४३

## बीभत्स

बीभत्स म्हणजे किळस, वीट किंवा तिटकारा वाटणाऱ्या गोष्टींचे वर्णन. प्रसंग पडल्यावर हेमाडपंतांनी यालही आपली कुशलता दाखविली आहे :

(१) माणसाने ममता टाकावी म्हणून नरदेहाचे मुद्दाम केलेले किळसवाणे वर्णन पहा :

**देहमळमूत्रांची न्हाणी । श्लेष्म-पूय-लाळींची घाणी ।**
**मरण ठेविलें क्षणोक्षणीं । कुलक्षणी मोठा हा ॥२०॥**
**जें हें कृमिकीटकांचें घर । नानारोगांचे आगर ।**
**अश्वत्थ आणि क्षणभंगुर । तें हें शरीर मानवी ॥२१॥**
**मांस-शोणित-स्नायूंचा गाडा ।**
**तो हा अस्थि-चर्माचा सांगाडा ।**
**मूत्र-पुरीष दुर्गंधीचा राडा । जीवाचा खोडा प्रत्यक्ष ॥२२॥**

- अध्याय ८

(२) संधिवाताने गांजलेल्या अमीर शक्करला बाबांनी ज्या चावडीत नऊ महिने राहण्यास सांगितले होते तेथील घाणीचे आणि हलाखीच्या स्थितीचे वर्णन पहा :

**चावडी ती मलिकंबरी । जीर्ण झालेली खालींवरी ।**
**जेथें सरड पाली विंचू विखारीं ।**
**स्वेच्छाचारीं नांदावें ॥११८॥**
**त्यांतचि वसती रोगी कष्टी ।**
**चालती न गोष्टी बाबांपुढें ॥११९॥**
**मागील भागांत भरला कचरा । ढोप ढोपर छिद्रें सतरा ।**
**हाल खाईना तयाचे कुत्रा ।**
**ती एक यात्राच जन्माची ॥१२०॥**
**वरून पाऊस खालून ओल । जागा उंच नीच सखोल ।**
**वाऱ्याथंडीचा एकचि कल्लोळ ।**
**मानसी घोळ अमीराचे ॥१२१॥**

- अध्याय २२

(३) आता स्वर्गातील विषयभोगांसाठी तळपणाऱ्या जनांसाठी खालील वर्णन पहा :

**स्वर्गा जा अथवा नरका । फरक नाहीं विषयसुखा ।**
**इंद्रा वा गर्दभा देखा । सुख विलोका एकचि ॥२२॥**
**इंद्र नंदनवनीं घोळें । तोचं रासभ उकिरडां लोळे ।**
**सुख पाहतां एकचि तुळे । नाहीं तें वेगळें लवमात्र ॥२३॥**

- अध्याय ३[illegible]

(४) आणि निंदकांसाठी खालील प्रसंग पहा :

**तेथेच एका कुंपणाशेजारीं । येथेष्ट विष्ठामिष्टान्नावरी ।**
**एक ग्रामसूकरी मिटक्या मारी ।**
**बाबा निजकरीं दाविती त्यां ॥२०४॥**
**'पहा या जिभेला काय गोडी ।**
**जनालोकांची विष्ठा चिवडी ।**
**बंधु-स्वजनांवर चडफडी । येथेष्ट फेडी निज हांस ॥२०५॥**
**बहुत सुकृताचिये जोडी ।**



आला नरजन्म ऐसा जो दवडी।
तया आत्मघ्ना ही शिरडी। सुखपरवडी काय दे' ॥२०६॥

- अध्याय १९

एकूण श्री साईसत्‌चरितात बहुतेक सर्वच रस भरलेले आहेत आणि हेमाडपंतांनी ते मोठ्या कौशल्याने रंगविलले असल्याने वाचकांचे मन ते प्रसन्न करतात. असो :

काव्यात काव्यालंकार व रसपरिपोष हेच महत्त्वाचे असतात. त्यावरूनच कवीच्या श्रेष्ठत्वाची कल्पना येते व काव्य वाचण्यात मन रंगून जाते. परंतु त्याबरोबरच कवीने शब्दालंकार वापरून अक्षरांची व शब्दांची योग्य व पटाईत निवड दाखवून काव्याला नादमाधुर्य आणले म्हणजे ते पुन्हा पुन्हा म्हणायला आवडते, कानाला गोड वाटते आणि केव्हा केव्हा तर कवीचे शब्द कौशल्य पाहून मन आश्चर्याने थक्क होऊन जाते. तेव्हा आपण हेमाडपंत कवींनी कोणकोणते शब्दालंकार वापरले आहेत ते पाहू या :

यमक म्हणजे तेच अक्षर चरणाच्या शेवटी किंवा मध्ये ठराविक ठिकाणी पुन्हा वापरणे होय. याचा उल्लेख पूर्वी 'छंदांची निवड' या शीर्षकाखाली हेमाडपंतांनी नेहमीच्या तीन यमकांच्या ऐवजी चार यमकांच्या एकनाथ महाराजांच्या धाटणीच्या ओवीची निवड केलेली सांगताना आलेला आहेच. तरीपण जेव्हा हेमाडपंत 'क्ष' 'ज्ञ' सारख्या अवघड व क्वचित प्रचारात असलेल्या अक्षरांचा, 'द्य' सारख्या जोडाक्षरांचा किंवा एकाहून जास्त अक्षरांचा यमकात वापर करतात तेव्हा मन आश्चर्यचकित होते.

(१) काय बाबा किती दक्ष।
जावो कोणाचें कोठेंही लक्ष।
ते तों स्वयें अंत:साक्ष।
सर्व प्रत्यक्ष तयांते ॥१६८॥

- अध्याय ४९

(२) कल्याणप्रद हा वाग्यज्ञ।
पुढें करूनि मजसम अज्ञ।
पूर्ण करी निजकार्यज्ञ।
श्रोते सर्वज्ञ जाणती ॥१२॥

- अध्याय ४५

(३) वर्ण ब्राह्मण अखिल वंद्य।
आणि ही सेवा ऐशी निंद्य।
शिवलें न केव्हांही हें विचारमांद्य।
तियेच्या अनवद्य अंतरा ॥१७८॥

- अध्याय ३५

(४) नैवेद्यार्थ शर्कराखंड। बाबासाहेब अर्पीत अखंड।
ऐसा नियम चालला उदंड।
पडला त्या खंड एकदिनीं ॥९०॥

- अध्याय ९

(५) ''पायां पडा'' हा कोणीही आग्रह।
धरणार नाहीं ऐसा दुराग्रह।
करूनि घेऊं नका हा ग्रह।
करा हा निग्रह मनाचा ॥१५५॥

- अध्याय १२

(६) राग तयाचा मोठा कडक।
येतांचि होईल लालभडक।
जाजा निघून जा कीं तडक।
धराकी सडक शिरीडीचा ॥१३८॥

- अध्याय ५

अनुप्रास म्हणजे एक किंवा अनेक अक्षरे पुन्हा पुन्हा वापरणे होय. यामुळे काव्याला गोडी नादमाधुर्य येते :

(१) धरावा नित्य सत्संग। इतर संग नित्य सव्यंग।
सत्संग एकचि निर्व्यंग। आणि प्रत्यंग निर्मळ ॥१४२॥

(संग ४ वेळा, अंग ४ वेळा) - अध्याय १०

(२) वर्ततां या नश्वर देहीं। देहगेहीं जो गुंतला नाहीं।
दिसाचा देही अंतरीं विदेही।
तो येचि देहीं निर्मुक्त ॥७४॥

(देहीं ४ वेळा, ही २ वेळा) - अध्याय १०

कित्येक वेळा प्रसंगाच्या वर्णनाला अनुसरून अनुप्रासासाठी योग्य अक्षरे निवडून कवी पदलालित्य तर साधतातच परंतु ओवीचा अर्थ समजविण्यास मदतही करतात :

(३) कधीं न खाणारा चाबूक फटका।
बाजारा जाणारा न भरतां घटका।



घोडा पडला कंबरेंत लटका।
भरला टचका एकाएकीं ॥१५॥

- अध्याय ९

(४) आपण मज अंधाची काठी।
असतां मज काय आटाटी।
टेकीत टेकीत पाठी पाठी।
धोपट वाटे चालेन ॥३७॥

- अध्याय ३

(५) घालूनियां तो डबींत घट्ट।
झांकिता आवाज होई जों खट्ट।
डबी हातीं पडतां ती झट्ट।
घराची वाट धरीतसे ॥२७॥

- अध्याय २९

(६) जन म्हणती माया लटकी।
परी ती आहे महाचेटकी।
ज्ञानियां फसवी घटकोघटकीं।
भक्त नाचविती चुटकीवरी ॥८०॥

- अध्याय ३९

(७) मज न लागे गाडीघोडी।
विमान अथवा आगिनगाडी।
हांक मारी जो मज आवडी।
प्रकटें मी ते घडी अविलंबें ॥३२॥

- अध्याय ४०

(८) घरोघरीं झाली हडबड। उडाली एकचि गडबड।
छातींत भरली धडधड।
लोक दडदड धांविन्नले ॥८६॥

- अध्याय ४३

(९) कुठला तांगा, कुठला शिपाई।
नट नाटकी ही माउली साई।
संकटसमयीं धांवत येई।
भावापायीं भक्तांच्या ॥११९॥

- अध्याय ३३

(१०) पुढें चालती मागें पहाती।
भीत भीत पायऱ्या चढती।
मंदमंद पाउलें पडती।
चिंतावर्ती बहु काका ॥७८॥

- अध्याय ६

(११) जैसा जैसा पैसा जमत। कामही तैसें तैसें होत।
पैसा थकतां कामही थकत।
ऐसें तें दिरंगत चाललें ॥१०२॥

- अध्याय ४७

(१२) ठाकोनियां तें रम्य स्थान।
जेथें शुद्ध निर्मळ जीवन।
मंद मंद वाहे पवन। समाधान पावले ॥९०॥

- अध्याय १३

(१३) गुर्वाज्ञापालनीं निधडा।
केला मनाचा एकदां धडा।
परी छाती उडे धडधडा।
घाम भडभडा सूटला ॥१५२॥

- अध्याय २३

(१४) बहिणी-बहिणींची ती गाठ।
बहुतां दिसीं झाली भेट।
चुंबिती मुख आलिंगिती दाट।
प्रेमाचा थाट अनुपम ॥९४॥
एकमेकींस घालीत गिरक्या।
आनंदाने मारीत भिरक्या।
गेल्या उभ्या आडव्या तिरक्या।
स्वच्छंद फिरक्या मारीत ॥९५॥

- अध्याय १५

आता तेच अक्षर किंवा अक्षर पुन्हा पुन्हा वापरून कवी आपले विचार कसे पक्के ठरवितात ते पहा :

(१५) जें अशब्द आणि अरूप।
अनादि अनंत आणि अमूप।
अव्यय अगंध अरस आलेप।
कवणातें स्वरूप वर्णवेल ॥६७॥

(अ ९ वेळा) - अध्याय ३७

(१६) साई भरला स्थिरचरीं। साई सर्वांच्या आंतबाहेरी।
साई तुम्हा-आम्हांभीतरीं।
निरंतरीं नांदतसे ॥१०९॥

- अध्याय ४४

(१७) जिचेनि दर्शनें नित्यतृप्ति।
जिचेनि सहवासें आनंदभुक्ती।
जिचेनि भवभयविनिर्मुक्ती।
ते साईमूर्ति हारपली ॥५॥
जिचेनि परमार्थमार्गप्रवृत्ती।





**जिचेनि मायामोहनिवृत्ती ।**
**जिचेनि आत्यंतिकक्षेमप्राप्ती ।**
**ते साईमूर्ति हारपली ॥६॥**

- अध्याय ४५

**(१८) भक्त जयास देव मानिती ।**
**जयाच्या ते पदरजीं लोळती ।**
**तयाची अवलोकिती काय जाती ।**
**परमार्थप्राप्ति धिक् त्यांची ॥९२॥**
**इहामत्रीं जो बाणला विरक्ती ।**
**विवेक वैराग्य जयाची संपत्ति ।**
**काय तयाची पहाणें जांती ।**
**परमार्थप्राप्ति धिक् त्याची ॥९३॥**

- अध्याय ३८

श्लेष म्हणजे एक किंवा अनेक शब्द वेगळ्या अर्थाने वापरणे. कवी हेमाडपंत यातही मागे पडलेले नाहीत :

**(१) श्रुति मौनावल्या ऐशियास्तव ।**
**अशेष मुखांहीं करितांही स्तव ।**
**शेषही नेणे स्वरूपवास्तव ।**
**तें मी कवण जाणावया ॥८॥**

(स्तव=साठी. स्तव=स्तुती. अशेष=सर्व. शेष=शेषनाग)
- अध्याय २२

**(२) शिरडी नांदेडीं महदंतर । त्या दोघांचे एक अंतर ।**
**एक प्राण एक शरीर । तेणें ही तार परस्परां ॥१९२॥**

(अंतर=मन. अंतर=हृदय)
- अध्याय १४

**(३) मशिदीहूनि जितुका आड ।**
**तितुकेंचि पुढें वडाचें झाड ।**
**तयाहीपलीकडे एक आड ।**
**दों दिवसांआड जात ते ॥५४॥**

(आड=विहीर. आड= नंतर)
- अध्याय ७

**(४) मुळे मूळचे घोलपभक्त ।**
**बाबांविषयीं जरी शंकित ।**
**परी झाले पुढें अंकित । अकलंकित मानसें ॥१३३॥**

(मुळे=आडनांव. मूळचे=पूर्वीपासून) - अध्याय १२

इतर साधनें

आपले काव्य आणखी वाचनीय व मनोरंजक करण्यासाठी कवी आणखी काही साधनांचा उपयोग करतात. हेमाडपंतांनी योजिलेली काही साधने अशी आहेत :

पुराणातील उदाहरणे

**(१) अंतकाळीं जैसी मति । तैसी प्राण्यांस लाभे गति ।**
**किडी भीतीनें भ्रमर होती । हरिणप्रीती जडभरत ॥६॥**

- अध्याय ३१

**(२) भयें अथवा प्रेमे जाण ।**
**जया जयाचें नित्य ध्यान ।**
**ध्याता होई ध्येयचि आपण ।**
**कंस रावण कीटकी ॥३८॥**

- अध्याय ४५

**(३) रामावतारीं रघुनंदने । अपार स्वर्णस्त्रियांची दानें ।**
**करितां षोडश सहस्त्र प्रमाणें ।**
**घेतलें कृष्णें तत्फल ॥१३६॥**

- अध्याय ३५

**(४) तों आले रामदास जलद ।**
**घेऊनि सोनामुखी अगद ।**
**अण्णा उभेच कळीचे नारद ।**
**वृत्तांत साद्यंत कळविला ॥१०१॥**
**आधींच रामदास आतताई । वरी नारदाची शिष्टाई ।**
**मग त्या प्रसंगाची अपूर्वाई ।**
**कोणी गाईल यथार्थ ॥१०२॥**

- अध्याय २७

**(५) निकट येता देहावसान । साधुसंत आणि सज्जन ।**
**घेती वाचवूनि पोथीपुराण ।**
**सावधान परसिती ॥४१॥**
**शुकाचार्य दिवस सात । कथिते झाले महाभागवत ।**
**ऐकूनि धाला राजा परीक्षित ।**
**सुखें देहान्त लाधला ॥४२॥**

- अध्याय ४३

पुराणातील/ उपनिषदांतील कथा

(१) अध्याय २४ मध्ये एकेकटे खाऊ नये व खाल्ल्याने कशी हानी होते या बाबांच्या उपदेशाचे वर्णन करीत असताना हेमाडपंत रम्य सुदामकथा सांगतात :



कृष्ण परमात्मा जयाचा सखा।
ऐसा हा भक्त सुदाम्यासारिखा।
नीतीस यत्किंचित होतां पारखा।
पावला धोका संसारी ॥८६॥
तोच स्वस्त्रीकष्टर्जित। प्रेमें मूठभर पोहे अर्पित।
कृष्ण होऊनि प्रसन्नचित्त। ऐश्वर्यतृप्त करी तया ॥८७॥

अध्याय २४

(२) अध्याय १४ मध्ये साईबाब भक्तांकडून दक्षिणा का मागत असत याचे कारण सांगत असताना हेमांडपंत प्रजापतींनी आपल्या देव, दैत्य व मानव या तीन अपत्यांना 'द' हा एकाक्षरी उपदेश केल्याची कथा सांगतात :

'दान्त व्हावें' देव समजले। 'दया करा' असुर समजले।
'दान' द्यावें मानव समजले।
प्रजापति 'भलें भलें' म्हणे ॥१३९॥

- अध्याय १४

## प्रचलित बोलीचा वापर

बाबा बोलत असलेली उर्दू भाषेतील वाक्ये किंवा तत्कालीन गावठी भाषेतील संवाद जसेच्या तसे ओव्यांत गुंफून तसेच वाक्प्रचारातील मराठी व इंग्रजी शब्द वापरून आपल्या वर्णनाला हेमाडपंतांनी केवळ यथार्थपणाच नाही तर सौंदर्यही आणले आहे उदा :

(१) ''साले रास्तेमें भजन करतें।
और दूसरे आदमीकू पूछते।
क्या दूसरेसे पूछना ॥६३॥
सब कुछ अपने आंखोसे देखना।
कायकू दूसरे आदमीकू पूछना।
झूठा है क्या सच्चा सपना।
करलो अपना बिचार आप ॥६४॥

- अध्याय २८

(२) 'आयांहूं न पैसेके लिये।
आज तो हमकू भोजन चाहिये'
देव म्हणाले 'आवो आनंद है।
घर ये समझिये आपका'
'क्या जरूर कब मैं हाजर रहूं।
जब बोलोगे तब आता हूं'।
संन्यासी बोलूं लागला ॥६७॥
'अच्छा बच्चे लेके साथ। बारा घंटे होने के बखत।
आवो भोजन पावो संत'
ऐसें तंव वदत देव तया ॥६८॥

- अध्याय ४०

(३) 'लई लांब झुकलांत' म्हणून।
आदरें मज पुसून राहिला ॥४४॥
'मशीद फार लांब येथून।
तेथें जाता होईल ऊन।
हें पलीकडे माझें सदन।
चिलीम पिऊन जाऊं की ॥४५..
तेथे वांईच खा कीं भाकर।
स्वस्थ आराम करा विळभर।
मग ऊन खालीं झालियावर।
खुशाल माघारां परतावें ॥४६॥
मीही येईन बराबर'।

- अध्याय ४७

(४) गौरीवीण जे जे अभिलाषिती।
तयांच्या माती तोंडात ॥१६४॥
खर्चीना हा पदरचा दाम।
गांठीचा छदाम सोडीना ॥८१॥
बोलाची नुसती पेरी साखर।
कामासी आकार येईना ॥८२॥

- अध्याय ४७

(५) गाडी आरंभी नीट चालली।
पुढें घोड्यांनी वाट सोडिली।
साऊळ विहीर मात्र ओलांडिली।
तों पुढें आली बायसिकल ॥३१॥
गृहस्थ होता मागें बैसला।
पुढें तांगा एकाकीं चमकला।
तोल जाऊनि तैसाच कलथला।
मागें उलंडला मार्गांत ॥३२॥
शिरडी राहिली एकीकडे।
मुंबई राहिली दुसरीकडे।
कोपरगांवीं आस्पीटल जिकडे।
तांगा मग तिकडे घेतला ॥३४॥

- अध्याय ९

## सारांश

'अशा प्रकारे हेमाडपंतांचा हा ग्रंथ सर्वांगसुंदर झालेला आहे. स्वत: हेमाडपंत अध्याय ३७ मध्ये म्हणतात की त्यांना काव्य करण्याचे माहीत नव्हते :

काव्यपदबंधव्युत्पत्ती। नेणें मी पामर मंदमती।
करधृत लेखणी धरोनि हातीं।
साईच लिहविती तें लिहितों ॥१११॥

- अध्याय ३७



हे जरी हेमाडपंतांचे विनयाचे बोल असले तरी कित्येक वेळा ते खरेच वाटू लागतात. हेमाडपंत हे विद्वान होते, वेदांत त्यांच्या मुखी पाणी भरत होते, संत वाङ्मयाचा त्यांचा गाढा अभ्यास होता हे सर्व कबूल. परंतु पेशाने ते मुलकी खात्यातील कर्तव्यदक्ष अधिकारी होते व नोकरीच्या शेवटी तर ते फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट (न्यायाधिश) म्हणून काम करणारे होते. असे रुक्ष व व्यावहारिक काम वर्षानुवर्षे करणाऱ्याला काव्य करण्याची स्फूर्ती व निपुणता कोठून असणार ! माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी पूर्वी कधी एकही ओवी किंवा कविता रचलेली नव्हती आणि त्यांचे चिरंजीव कै. डॉ. गजाननराव यांनीही मला तसे सांगितले होते. तसेच खुद्द हेमाडपंतांनीही अध्याय २ मध्ये तेराव्या शतकातील 'बहुगुणीं सर्वलक्षणी' हेमाद्रिपंताचे वर्णन करताना म्हटले आहे :

**तयाचा 'लेखनकल्पतरु' । नाना चित्रकाव्यांचा आकरु ।**
**मी हें ऐसें बाबांचे लेंकरुं । येईना करूं ओवीही ॥१८०॥**

मग असे हे उत्कृष्ट ९००० च्यावर ओव्यांचे रसात्मक काव्य ज्यांत उपमा, दृष्टान्त, अलंकार व रसपरिपोष यांचा भरपूर भरणा आहे ते हेमाडपंतांच्या हातून कसे रचले गेले ! तर त्याचे मर्म खुद्द त्यांच्याच वर उद्धृत केलेल्या ओवीतील 'मी हे ऐसें बाबांचे लेकरू' या शब्दांतच आहे. गुरुकृपेशिवाय असामान्य व प्रासादिक ग्रंथ लिहीणे कधीही शक्य नाही.

**मशके काय उचलावा मरू । टिटवी जै उपसावा सागरू ।**
**परी पाठीं असता सद्गुरू । अद्भूत करणी घडविती ॥**

ते काहींही असो. या श्री साईसच्चरिताची अशी अध्यात्मिक श्रेष्ठता आहे तशीच काव्यात्मक श्रेष्ठताही आहे आणि त्याचे काय वर्णन करावे ! असा ग्रंथ व त्याचा कर्ता लाभणे हे आपले भाग्य :

**कोण वानील श्री साईचरिता ।**
**किती अनुपम ग्रंथयोग्यता ।**
**लाधला हेमाडपंतासम कर्ता ।**
**परम सौभाग्यता मुमुक्षूंची ॥१५६॥**
**यावत् ग्रंथ महीतळीं । तावत् कीर्ती भूमंडळीं ।**
**गोविंदराये केली दिवाळी । वेळींच मुमुक्षूंकारणें ॥१५७॥**

- अध्याय ५३

卐 卐 卐

---

# बुद्धीचा महिमा

भारतीय संस्कृतीत अंधश्रद्धेला स्थान नाही. विचाराचा महिमा सर्वत्र गाईलेला दिसून येईल. भारतीय संस्कृतीचा वेद हा पाया मानला जातो. परंतु वेद म्हणजे काय ? वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे. ज्ञानावर उभारलेली ही भव्य संस्कृती आहे.

वेद किती आहे ? वेद अनंत आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद अथर्ववेद एवढेच वेद नाहीत. भारतीय संस्कृतीचा एकच ऋषी नाही, एकच पैगंबर नाही, एकच वेद नाही. भारतीय संस्कृती गगनाप्रमाणे विशाल व सागराप्रमाणे अपार आहे. जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. आपले आयुष्य आनंदी व उत्साही कसे राहील, हे आयुर्वेद सांगेल. समाजाचे रक्षण कसे करावे, ते धनुर्वेद सांगेल. समाजाची करमणूक कशी करावी, समाजाला दु:खाचा विसर कसा पाडावा, ते गंधर्ववेद सांगेल. हे सारे वेदच आहेत.

काल अनंत आहे व ज्ञान अनंत आहे. नवीन नवीन ज्ञानउदयास येईल व भारतीय संस्कृती सर्वांआधी त्या ज्ञानाचा सत्कार करावयास उभी राहील. भारतीय संस्कृतीला ज्ञानाहून दुसरे काहीही पवित्र वाटत नाही, ज्ञानोपासकांबद्दल भारतीय संस्कृतीला नितान्त आदर आहे. भारतीय संस्कृती एकाच काळी सारे ऋषी झाले असे कधीही मानणार नाही. असे म्हणणे अहंकार आहे. तो परमेश्वराचा अपमान आहे. सारे ज्ञान जर खलास झाले असेल तर सृष्टीच्या अस्तित्वाची काही जरूरच नाही. शोधावयास काही जर शिल्लकच नसेल, तर मानवाच्या उत्पत्तीला काही अर्थ उरला नाही.

**– साने गुरुजी**

(दै. महाराष्ट्र टाईम्स च्या सौजन्याने)






# मानव कल्याणाची मंगल प्रार्थना

## मंत्रपुष्पांजली

**वेदमूर्ती स. कृ. देवधर**



शिरडी येथील श्री साईबाबांच्या समाधी मंदिरात प्रत्येक पूजेनंतर मंत्रपुष्पांजली म्हटली जाते. मंत्रपुष्पांजली एक दिव्य प्रार्थना आहे. कल्याणकारी मंगलाची ती एक आराधना आहे. व्यष्टि चे कल्याण हेच समाविष्टचे मंगल व तेच मानव जातीचे श्रेयस असा उदात्त भाव या मंत्रपुष्पांजली मागे आहे. प्रत्येक कार्यामागे सदिच्छांचे बळ लागते ते बळ ही प्रार्थना उभी करते व कार्याचे सत्कार्य होते.

भारतीय मनिषींच्या मानवकल्याणाच्या अपेक्षा कशा उदात्त होत्या व आहेत त्याचेच दर्शन या प्रार्थनेतून होते.





भगवंताची पूजा केल्यावर आरती केली जाते आणि त्यानंतर मंत्रपुष्पांजली म्हणून भगवंताना फुले किंवा अक्षता समर्पण करण्यात येतात. मंत्रपुष्पांजली म्हणून जे मंत्र म्हटले जातात त्यांचा अर्थ समजावून घेणे उचित असते. या मंत्रपुष्पांजलीच्या मागे एक विशिष्ट प्रेरणा आहे. पूर्वीच्या काळी राजा देशाचे आणि पर्यायाने प्रजेचे रक्षण करीत असे. राजाला ज्यावेळी राज्याभिषेक केला जात असे तेव्हा सर्वजण व्यावहारिक नजराण्याबरोबर, शुभेच्छाही प्रदान करीत असत. अशी पारंपारिक समजूत आहे की थोरामोठ्यांचा आशीर्वाद जे काम करू शकेल ते पैसा अगर सैनिक सामर्थ्याने सुद्धा होणार नाही. पूर्वी असा आशीर्वाद प्राप्त व्हावा म्हणून श्रेष्ठांचा गौरव करण्याची पद्धत होती. सर्वात श्रेष्ठ आशीर्वाद कोणाचा ते परिचित करून देण्यासाठी उपनिषदांनी आणि त्यानंतर मन्वादि श्रुतिकारांनी एक क्रम ठरविला आहे. तोच क्रम आजही अस्तित्वात आहे. या जगात कोणी कितीही मोठा असो तो मातेपेक्षा केव्हाही मोठा असू शकत नाही. म्हणून एखाद्या समारंभामध्ये किंवा संस्कार कार्यात सर्वात प्रथम मातेलाच नमस्कार केला पाहिजे असा श्रेष्ठसंकेत ठरला गेला. त्यामुळेच उपनिषदांनी हा क्रम सांगतांना असे प्रतिपादन केले आहे.

**मातृदेवो भव ।**
**पितृदेवो भव ।**
**आचार्य देवो भव ।**
**अतिथी देवो भव ।**
**सर्वेभ्यो देवो नमः ।**
**सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमः ।**

यापैकी कोणाला कसा नमस्कार करावा याचे देखील एक श्रेष्ठसंमत शास्त्र तयार करण्यांत आले आहे. आई, पिता आणि गुरु यांना नमस्कार करतांना त्यांच्या पायांच्या आंगठ्यार आपले मस्तक विशेषत: मस्तकाची गंडस्थळे टेकूनच नमस्कार करावा अतिथीला नत होऊन नमस्कार करावा. त्याप्रमाणे देव आणि ब्राह्मणांना साष्टांग नमस्कार घालावा. त्यांच्या पायांना स्पर्श करण्याची आवश्यकता नाही. ज्याला नमस्कार करावयाचा त्याने आशीर्वाद दिला पाहिजे किंवा सदिच्छा व्यक्त केल्या पाहिजेत असे त्यांच्यावर अलिखित प्रेमळबंधन असे. त्यांतील देवांखेरीज सर्व व्यक्ति समाजातच असतात. देवांच्या प्रतिमा अगर प्रातिनिधिक चिन्ह निर्माण करून त्यांची जोपासना करण्याचे कार्य देखील एक सामाजिक कार्य आहे असे मानले जात असे आणि त्याची सर्व जबाबदारी राजावर टाकण्यात येत असे. या कारणासाठी सर्व प्रजेच्या सदिच्छा राजाला प्रदान करण्यात येत असत. त्यामुळे राजाला विशेष सामर्थ्य प्राप्त होत असे आणि त्या सामर्थ्याचा उपयोग तो प्रजापालनासाठी करीत असे. अशा राजाला आशीर्वाद किंवा सदिच्छा प्रदान करण्याच्या निमित्ताने राजाला नित्य सुगंधित असणारी पुष्पे अर्पण करून किंवा अक्षता (न मोडलेले सुशोभित केलेले तांदूळ) अपर्ण करून हि क्रिया साधण्यात येत असे. त्यावेळी वेदमंत्रांनी त्या पुष्पांना आणि अक्षतांना पावित्र्य आणले जात असे. हा विधी राज्याभिषेकाच्या वेळी, राजा स्वारीवर जात असेल तर किंवा एखाद्या सत्कर्माचा प्रारंभ करण्यासाठी जात असेल तर हा विधी मुद्दाम करण्यात येत असे. वेदज्ञ ब्राह्मणांनी मंत्र म्हणावेत त्या नंतर ते मंत्र ज्यांनी ऐकले आहेत त्या सर्वांनी राजावर पुष्पे अगर अक्षता उधळण्याचा कार्यक्रम करावा असा संकेत असे.

पुढे राजा हा विष्णूचा अंश आहे म्हणून त्याला पुष्पे अगर अक्षता समर्पण करण्याची क्रिया होत होती तीच क्रिया नंतर देवाशी जोडली गेली. तेव्हांपासून या क्रियेला प्रांपचिक स्थान प्राप्त झाले. पूर्वीपासून ही प्रथा अस्तित्वात होती. ती आजही तशीच चालू आहे. यामध्ये आता जो फरक झाला तो एवढाच की भगवंताच्या पूजेनंतर आपले कल्याण व्हावे म्हणून या प्रार्थनेचा उपयोग होऊ लागला. ही प्रथा केव्हांपासून सुरु झाली ते समजायला मात्र मार्ग नाही.

ही पुष्पांजली म्हणतांना पूर्वीच्या प्रथेचा अवलंब आजही केला जातो. त्याठिकाणी उपस्थित असणारी मंडळी हातात फुले अथवा अक्षता घेतात. पुष्पांजलीचे मंत्र एक जण अगर सर्व जण देखील म्हणतात, आणि अखेर ज्या देवतेच्या समोर हे मंत्र म्हटले जातात त्या देवतेच्या गायत्रीचा उच्चार करून हातातील फुले अगर अक्षता देवांना वाहातात. या बद्दल अशी शंका येण्याची शक्यता आहे की प्रत्येक देवतेची गायत्री म्हणजे काय ? कृष्णयजुर्वेदाची मैत्रायणी संहिता किंवा विविध उपनिषदे यांनी या गायत्री स्पष्ट केल्या आहेत. काही ठिकाणी ही संख्या ४० पर्यंत असल्याचे दिसून येते. वेदांमध्ये जी मूळ गायत्री ऋचा (ऋग्वेद - ३-६२-१०) आहे. त्या ऋचेतील धीमहि आणि प्रचोदयात् या दोन पदांचा वापर या गायत्रीमध्ये करण्यात आला आहे. उदाहरणार्थ - गणेशगायत्री अशी आहे.

**एकदन्ताय विद्महे । वक्रतुण्डाय धीमहि ।**
**तन्नो दन्ती प्रचोदयात् २॥**

या प्रकारे तयार करण्यात आलेल्या गायत्रीमध्ये **धीमहि** (ध्यान करता) **प्रचोदयात्** (प्रेरणा देवो) ही मूळ गायत्री मंत्रातील पदे तशीच आहेत. शिवाय **विद्महे** (जाणतो) असे एक पद सर्वत्र आढळते. खरे तर गायत्रीचा आणि पुष्पांजलीचा तसा फारसा संबंध नाही. परंतु त्या देवतेचा जय जयकार करण्याच्या निमित्ताने बहुधा या गायत्रीचा उपयोग करण्यात येत असावा असे म्हणावेसे वाटते.

या मंत्रपुष्पांजलीच्या मंत्रांची रचना करतांना वेद, आरण्यक आणि ब्राह्मण अशा ती ग्रंथातील मंत्र एकत्रित करण्यांत आले आहेत. त्याप्रमाणे वेदामधील एक मंत्र, तैत्तिरीय आरण्यकांतील एक मंत्र आणि ऐतरेय ब्राह्मण ग्रंथातील दोन मंत्र एकत्रित करून या मंत्रनिधीची संहिता तयार करण्यात आली आहे. कारण आपण जे म्हणतो त्याचा अर्थ काय तो जर कळला तर मंत्र पठणातील गोडवा आणि श्रद्धा यांची चांगल्याप्रकारे वृद्धि होते आणि त्या बरोबर आनंद देखील निर्माण होतो.





**ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।**
**ते ह नाकं महिमान: सचन्त यत्र पूर्वे साध्या: सन्ति देवा: ।**

(ऋग्वेद १-१६४-५०, १०-९०-१६, कृष्ण यजुर्वेद तैत्तरीय संहिता ३-५-११-५ ऐतरेय ब्राह्मण १-१६-३५, तैत्तिरीय आरण्यक ३-१२-७ शुक्ल यजुर्वेद वाजसेनीय शाखा ३१-१६ काण्व ३५-१६ मैत्रायणी संहिता ४-१०-७१)

## पदच्छेद :

**यज्ञेन यज्ञम् अजयन्त देवा: तानि धर्माणि प्रथमानि आसन्।**
**ते ह नाकं महिमान: सचन्ते यत्र पूर्वे साध्या: सन्ति देवा:॥**

**अर्थ :-** देवांनी यज्ञरूपी साधनांनी देवाची आराधना पूजा केली कारण या सर्व गोष्टी प्रारंभापासूनच धर्ममय होत्या. त्यामुळे ज्या ठिकाणी पूर्वीचे साधक लोक राहतात. अशा सर्वसुखमय (स्वर्ग) अवस्थेला ते साधक प्राप्त होतात.

## स्पष्टीकरण

**यज्ञेन :-** 'ज्याप्रमाणे मनाने संकल्प केला होता त्याप्रमाणे' असा या शब्दाचा अर्थ सायणभाष्यांत आहे. तर भट्टभास्करांच्या भाष्याप्रमाणे 'यज्ञमय इच्छा झालेल्या साधनेतून-असा अर्थ प्रतीत होतो. यज्ञ या पदाचे स्वरूप यज्-यज्ञ करणे, पूजा अर्चा करणे, साधना करणे असा अर्थ आहे. यज्ञ म्हणजे 'सर्वकर्मसमुच्चय' असाही एक अर्थ आहे. यज्ञ म्हटला की सुतार गवंड्यांपासून व्युत्पन्न ब्राह्मणापर्यंत सर्वांच्या सहाय्याची गरज असते. थोडक्यात यज्ञ करणे हे केवळ ब्राह्मणाचे काम आहे असे नाही. ब्राह्मणांनी आपल्या कामाला प्रारंभ करण्यापूर्वी जागा तयार करणे, त्या ठिकाणी मंडप उभारणे, विटा तयार करणे, यज्ञाची संरक्षण व्यवस्था करणे, पूजा-साहित्य आणि हवनीय साहित्याची जमवाजमव करणे, भोजन प्रबंध, अतिथी - अभ्यागतांचे स्वागत आणि सुविधा अशा कितीतरी गोष्टी कराव्या लागतात. पूर्वीच्या काळाचा विचार केला तर जे चार वर्ण मानण्यांत येत होते त्या वर्णांची कामेही निश्चित स्वरूपाची होती. ती ती कामे त्या त्या वर्णाच्या लोकांना वाटून देण्यात येत असत. यज्ञ हे देवता प्रसन्न व्हावी म्हणून करावयाचे एक महान साधन आहे. साधन तयार करतांना त्यामध्ये उपकरणे व उपयुक्त गोष्टींचे साहाय्य घ्यावे लागते. लिहिण्यासाठी उत्तम लेखणी तयार झाली की चाकू बाजूला करावा लागतो. त्याप्रमाणे एक कर्म दुसऱ्या कर्माची नांदी ठरते. या सर्व प्रक्रियेला यज्ञ अशी संज्ञा आहे. या सर्व क्रियांना एक फळ निश्चितपणे असते. त्याप्रमाणे ते फळ यज्ञदेवता साधकास देण्यास तयार असते परंतु साधक मात्र त्या फळाला मर्यादा निर्माण करतात आणि मिळणारे फळ सीमित होते.

ज्ञानेश्वर महाराज या बाबतीत असे सांगतात की देवाच्या प्रियत्वासाठी यज्ञ केला जातो. देव प्रसन्न झाला तर त्याचे चिरंतन प्रियत्व न मागता प्रापंचिक पसारा वाढविणाऱ्या वस्तु मागण्यात साधक तत्पर असतो. अर्थात स्वाभाविकपणे :-

**पुनरपि जननं पुनरपि मरणं**
**पुनरपि जननीजठरे शयनम् । इह संसारे --**

या श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या उक्तीप्रमाणे त्याच्या पाठीमागचा संसाराचा प्रवास मात्र तसाच चालू राहातो. हा विषय स्पष्ट करतांना ज्ञानदेव म्हणतात.

**जे श्रुतित्रयाते जाणोनि । शतवरी यज्ञ करूनी ।**
**यजिलिया माते, चुकोनी । स्वर्गु वरिती ॥** (ज्ञा. ९-३१०)
**स्वर्गु नरकु या वाटा । चोरांचिया ॥** (ज्ञा. ९-३११)

याप्रमाणे साधक फसतो. तो फसू नये त्याला सर्वोत्तम अवस्थेची प्राप्ति व्हावी ही यज्ञामागील प्रमुख प्रेरणा आहे. थोडक्यात साधकाला प्रापंचिक व पारमार्थिक सर्वोच्चता प्राप्त व्हावी हा या प्रार्थनेमागील शुद्ध हेतू आहे.

**यज्ञम् :-** यज्ञौ वै प्राणा: । यज्ञो वै प्रजापति: । यज्ञ एव पुरुष: । अशी श्रुतिवचने आहेत. त्याप्रमाणे देवता, असा या ठिकाणी अभिप्रेत अर्थ आहे. प्रापंचिक स्वरूपांत साकार देवता तर पारमार्थिक अवस्थेत आत्मा असे या यज्ञम् चे स्वरूप आहे. त्या देवतेला आपलेसे करून घेणे किंवा आत्मज्ञान प्राप्त करून घेणे असा या पदाच्या मागे सुप्त अभिप्राय आहे.

**अजयन्त :-** यज् धातूचे प्रथम भूतकाळ तृतीय पुरुष बहुवचन प्रथमभूतकाळी रूप या क्रियेने प्राचीनत्व लक्षात येते. या क्रियापदाचा संदर्भ यापुढील वाक्याशी आहे. पूजन केले किंवा साधना केली असा याचा अभिप्राय.

**देवा: -** देव. देव म्हणजे ज्यांना सर्व समृद्धि प्राप्त झालेली आहे असे लोक असा अर्थ केला जातो. या प्रार्थनेतील वाक्याचा देवा: असा कर्ता आहे. यावरून हे स्पष्ट होईल की देवांना सुद्धां त्यांच्या कल्याणासाठी पूजनादि क्रिया कराव्या लागतात कारण देव जरी झाले तरी त्यांना आयुर्मर्यादा आहे. या देवांचा राजा इन्द्र याची स्थिती वर्णन करतांना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात :-

**येरां सुरगणांची नवाई । विशेष सांगावी येथ कायी ।**
**मुदला इंद्राचीच दशा पाही । जे दिहाचे चौदा ।** (ज्ञा. ८-१५८)

इतर देवांचे कौतुक नवलाई येथे काय सांगू ? मुळांत देवांचा राजा इंद्र त्याची अवस्था पाहाना. ब्रह्मदेवाच्या एका दिवसांत तो चौदा वेळा जन्म घेतो आणि चौदा वेळा मरतो. थोडक्यात जन्म-मरणाचा प्रवास





देवांनाही सुटला नाही. त्यांनाही संसार आहे. संसार पूर्णत्वाने नाहीसा होणे हे सर्वश्रेष्ठ कल्याण आहे. देवांनी त्यामार्गाचे अनुकरण केले.

**तानि :–** तद् सर्वनामाचे प्रथमा बहुवचन. धर्माणि या शब्दाच्या अर्थाला विशेष आकार देण्याचे कार्य या दर्शक सर्वनामाने केले आहे. ह्या क्रिया पूर्वीपासून प्रसिद्ध होत्या. त्याच क्रियांकडे या सर्वनामाने बोट दाखविले आहे.

**धर्माणि :–** धर्मम् प्रथमेचे बहुवचन. जग ज्यामुळे आकाराला आले त्याचे पोषण झाले आणि विशिष्ट कालमर्यादेनंतर ते लयालाही जाणार आहे या क्रियापरिणामांना धर्म असे संबोधन आहे. धारयति लोकान् धर्मः। अशी धर्माची एक व्याख्या आहे. याचाही अर्थ तोच आहे. जोपर्यंत साध्य प्राप्त झाले नाही तोपर्यंत पोषण करणे आणि त्यातून निर्माण झालेल्या सामर्थ्याने साध्यासाठी वाटचाल करणे याला धर्म अशी संज्ञा आहे. पूर्वी जे प्रज्ञावन्त झाले आहे त्यांनी स्वतः अनुभव घेऊन या क्रिया कोणत्या आणि त्यांचा आचार कसा करावयाचा याचे मार्गदर्शन केले. मृत्यूलोकांतील निवासितांना आणि स्वर्गातील देवांना या मार्गाचे उचित ज्ञान त्यांनी प्रदान केले.

**प्रथमानि :–** धर्म शब्दाचे विशेषण. अर्थ :– पूर्वीपासून उपरोक्त वाक्यात प्रतिपादन केल्याप्रमाणे हे मार्गदर्शन पूर्वीपासूनच करण्यात आलेले होते परंतु त्या मार्गावर पदन्यास करण्याचे पहिले कार्य देवांनी केले. त्या क्रियेचे आणि फलाचा आदर्श मनुष्यमात्रांनी आपल्या समोर ठेविला. या मार्गाचे प्राचीनत्व दर्शविण्यासाठी या पदाचा उपयोग करण्यात आला हे स्पष्ट होते.

**ते :–** दर्शक सर्वनाम. देवाः या शब्दाशी संबंध. ज्यांनी उपरोक्त अति प्राचीन मार्गाचे अनुसरण केले ते देव.

**देवाः :–** देव. ज्यांनी या मार्गाचा अवलंब केला त्यांना काय फळ प्राप्त झाले ते सांगण्यासाठी कोणते देव अशी शंका निर्माण करून त्याचे उत्तर देतांना उल्लेख केला ते देव होत.

**महिमान :–** ज्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. मोठेपणामुळे ज्याच्याकडे अंगुलीनिर्देश करावा लागतो असे मोठे स्थान.

**नाकम् :–** स्वर्ग. वेदानी स्वर्ग ही सर्वोत्तम अवस्था असल्याचा निर्वाळा दिला आहे. परंतु श्रीमत् भगवद्गीता असे प्रतिपादन करते की आत्यंतिक पुण्यकर्माच्या शिदोरीने स्वर्गाची प्राप्ती होते. त्या ठिकाणी जी सुविधता आणि भोग ते या पुण्याईमुळे उपभोगता येतात. त्यामध्ये संचित पुण्याई खर्च पडते. ज्यावेळी ही पुण्याई संपेल तेव्हा त्या पुरुषाला पुन्हा मृत्युलोकी यावे लागते. त्याच्या पाठीमागे पुन्हा संसार लागतो. याचा स्पष्ट अर्थ असा की स्वर्ग असो अगर नरक असो तेथील निवास संपुष्टात आला की त्या पुरुषाला पुन्हा संसारात पदार्पण करावे लागते. असे असेल तर स्वर्ग ही भोगभूमि ठरते. त्या ठिकाणी जाण्याने संसार संपत नाही किंवा परमेश्वराचे प्रियत्व पण प्राप्त होत नाही. यावर ज्ञानदेवांचा अभिप्राय अभ्यासनीय आहे.

ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात स्वर्गात कोणत्या सुविधा आणि कोणते भोग उपलब्ध आहेत त्यांचे ते वर्णन करतात. (अध्याय ९ ओव्या ३२० ते ३२६) त्यानंतर स्वर्गोपभोगांतून काय प्राप्त होते ते सांगताना म्हणतात.

**मग तया पुण्याची पाउटी सरे । सवेचि इन्द्रपणाची उटी उतरे ।**
**आणि येऊ लागती माघारे । मृत्युलोकां ॥** (ज्ञा. ९-३२८)

स्वर्गाची आणि स्वर्गस्थ इंद्राची भोग मर्यादा काय आहे याचे वर्णन करतात. स्वर्गात अगर नरकात जाण्यासाठी जी पुंजी जवळ असावी लागते तिच्याबद्दल सांगतांना ज्ञानदेव मुद्दाम असे सांगतात की -

**स्वर्गा पुण्यात्मकं पापं येईजे । पापात्मकं पापं नरका जाईजे ।**
**मग मातें जेणं पाविजे । ते शुद्धपुण्य ॥** (ज्ञा.९-३१६)

पुण्यात्मक पाप म्हणजे पुण्याचा देखावा परंतु आत अनिष्ट हेतु असणे. इदं न मम म्हणून केलेल्या यज्ञाच्या देवतेला आहुती देऊन प्रसन्न करणे असे आहे पण मनात मात्र स्वर्गोपभोगाचा लाभ असतो याला पुण्यात्मक पाप म्हणतात. त्याने मनुष्य स्वर्गात येतो. पापात्मक पाप म्हणजे बाहेर देखावाही पापाचा आणि हेतू देखील पापाचा असेल तर ते पापात्मक होय. या योगे मनुष्य नरकात जातो. म्हणून ज्ञानवान लोक अशा स्वर्गाला उपासनेतील किंवा परमेश्वरात मिळून जाण्याच्या क्रियेतील अडथळा किंवा घात समजतात कारण स्वर्गात जाण्यास उपयुक्त वाटणारे पुण्य खोटे आहे.

**मज येतां पैं सुभटा । या द्विविधा गा अव्हांटा ।**
**स्वर्गु नरकु या वाटा । चोरांचिया ॥** (ज्ञा.९-३१५)
**म्हणोनि मजवीण पाविजे स्वर्गु । तो अज्ञानाचा पुण्यमार्गु ।**
**ज्ञानिये तयातें उपसर्गु । हानी म्हणती** (ज्ञा.९-११३)

थोडक्यात ज्ञानी लोक या दोन्ही लोकांना मुळीच किंमत देत नाहीत. कारण दोन्हीही भोगभूमीच आहेत. नरकातील किड्याला त्याच्या मादीपासून जे सुख प्राप्त होते तेच सुख स्वर्गातील इंद्राला त्याच्या पत्नीपासून प्राप्त होते. सुखाची जात एकच पण स्थळ भिन्न एवढाच फरक यांमध्ये आहे.

**येथ उर्वशिया इन्द्र सुखी । जैसा का स्वर्गलोकी ।**
**तैसाचि कृमीही नरकीं । लोळतु श्लाघे ॥८॥**
**म्हणौनि नरक स्वर्गु । नव्हे पाप–पुण्य भागु ।**
**जे दोहीं ठायीं सुखभोगू । कामाचाचि तो ।** (ज्ञा.१६-३०९)

ज्ञानेश्वरीतील हे स्वर्ग आणि नरक यांचे मोठे मार्मिक दर्शन ज्ञानदेवांनी घडविले आहे. म्हणून या ठिकाणी असे म्हणावसे वाटते की





उपरोक्त मंत्रातील स्वर्ग हे पद सर्वोच्च सुखमयतेचे नाही. ज़रा निराळ्या शब्दात सांगायचे तर ज्या ठिकाणी पोहोचल्यावर परत फिरावे लागणार नाही असे श्रीमत् भगवद्गीतेने कथन केलेले स्थान म्हणजे सर्वोच्च सुखमयता होय.

**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥** (गीता १५:६)

**किंवा**

**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥** (गीता - ८:१६)

एवढे मोठे भाष्य करण्याचे कारण एकच की या मंत्रामध्ये प्रापंचिक सर्वोच्चता आहे. पारमार्थिक सर्वोच्चता नाही. सामान्य साधकाची सामान्य गती स्वर्गापर्यंतच जाते असे मानून या मंत्रात 'नाकं' या पदाचा विनियोग करण्यात आला आहे.

**सचन्त :-** किंवा सयन्ते - प्राप्त करतात. स्थळापर्यंत पोहोचतात.

**यत्र :-** ज्या ठिकाणी नाकं या पदाचे निर्देशन करण्यासाठी हे अव्यय या ठिकाणी उपयोगात आणले आहे.

**पूर्वे :-** पूर्वी काळी. पूर्वीचे.

**साध्या: :-** साधक. साधना करणारे हे पद देवांना उद्देशून योजण्यात आले आहे.

**सन्ति :-** त्या ठिकाणी स्वर्गात वास करतात. सन्ति वर्तमान काळी तृतीय पुरुषी बहुवचनी रूप आहे. पूर्वी देव साधक बनले. त्यांनी तीव्र साधना केली. त्यामुळे त्यांना समृद्धि प्राप्त झाली. ही समृद्धि ज्या ठिकाणी आहे त्याला स्वर्ग असे नाव आहे. देवानी फार पूर्वी साधना केली त्यामुळे त्यांना हे पद प्राप्त झाले. अशा ठिकाणी गेल्यावर देव किती दिवस राहिले अशी शंका घेणे अप्रस्तुत नाही. त्या दिवसांपासून ते देव त्या ठिकाणी राहू लागले आणि आजच्या वर्तमानकाळी सुद्धा ते राहात आहेत. या ठिकाणी शब्दाचे वर्तमानकाळी रूप विनियोगात आणून चिरंतन निवासाचे प्रतिपादन करण्यात आले आहे.

**ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।**
**स मे कामान्कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।**
*कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ॥*

(तैत्तिरीय आरण्य १-३१-१२७)

## पदच्छेद :

**ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।**
**स मे कामान्कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।**
**कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ॥**

हे मंत्र तैत्तिरीय आरण्यातील पहिल्या अध्यायातील प्रपाठक ३१ मध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. या आरण्यकांत प्रणवोपासन मंत्र म्हणून जे मंत्र दिलेले आहेत. त्यामध्ये उपरोक्त मंत्र आहेत. तैत्तिरीय आरण्यकावर भट्टभास्कर नावाच्या प्रज्ञावंताचे भाष्य आहे. या मंत्राचा अन्वय पुढील प्रमाणे आहे.

**प्रसह्यसाहिने राजाधिराजाय वैश्रवणाय वयं नमः कुर्महे ।**
**सः कामेश्वरः वैश्रवणः मे कामान् कामकामाय मह्यं ददातु ।**
**वैश्रवणाय महाराजाय कुबेराय नमः ॥**

**सरळ अर्थ :-** सर्व प्रकारचे फळ प्राप्त होण्यासाठी जो कष्ट सहन करतो अशा राजांचा राजा असलेला वैश्रवणाला आम्ही वन्दन करतो. सर्व इच्छांचा स्वामी असलेला वैश्रवण माझ्या ज्या निरनिराळ्या इच्छा आहेत त्याप्रमाणे माझ्या इच्छा परिपूर्ण करो. महाराज वैश्रवणबंधु कुबेराला नमस्कार असो.

**राजाधिराजाय :-** अन्य राजे लोक सुद्धा ज्याला राजा म्हणून संबोधतात असा पुरुष. तो आपल्या दिव्यत्वाने नेहमी विराजत असतो. हे वैश्रवणाचे विशेष गुण दर्शविणारे पद आहे..

**प्रसह्यसाहिने :-** प्रसह्यसाहिन म्हणजे कष्ट सहन करणारा. विशेष कष्ट सहन करून दुसऱ्याचा उपयोगी पडणारा वैश्रवणाचा गुणदर्शन शब्द.

**वैश्रवणाय :-** विश्रवस्य अपत्यं वैश्रवण इति विश्रव हा ऋषी होता. पुलस्य ऋषींचा हा पुत्र. तो तपसाधना करीत असता कैकसी नावाच्या राक्षस कन्येने त्याला त्याच्यापासून आपणास पुत्र व्हावा अशी कामना प्रकट केली. ती वेळ संध्याकाळची होती. या ऋषीने तिला वेळ, काळ, शरीर भोग आणि विकृत परिणामांची कल्पना दिली. पण ती आपला हट्ट सोडायला तयार होईना. तो आपणास टाळत आहे. असे दिसताच तू षंढ आहेस म्हणून मी जगाला सांगेन असें त्याला सांगितले. तेव्हा नाइलाजाने विष्णूचा सूड घेणाऱ्या पुत्राची इच्छा करणाऱ्या कैकसीला रावण, कुंभकर्ण, शूर्पणखा वगैरे राक्षसी वृत्तीची अपत्ये झाली. त्याच विश्रवाला दुसऱ्या स्त्रीपासून कुबेर व कुंभिनासी नावाची कन्या झाली. त्यामुळे कुबेराला वैश्रवण असे दुसरे नाव आहे. कुबेर हा धनपति आहे. देवांचा त्याला आश्रय आहे इतकेच नव्हे तर भगवान शिवांचा तो उपासक आहे. त्याच्या उपासनेला आणि वैभवाला नमस्कार करून ते वैभव प्राप्त व्हावे म्हणून हा मंत्र आहे. त्या कुबेराचे वैभव या मंत्रात वर्णन केले आहे.

**कामान् :-** काम इच्छा किंवा वासना. काम शब्दाचे द्वितीया बहुवचन.

**कामकामाय :-** इच्छा करणारा.





**कामेश्वरो :–** सर्व प्रकारच्या इच्छा पूर्ण करण्याचे सामर्थ्य असणारा समर्थ पुरुष.

**मह्यं :–** अस्मत् शब्दाचे चतुर्थीचे एक वचन. माझे काम पुरे कर इतरांचे नव्हे, किंवा मी ज्या इच्छा करतो त्यांचीच परिपूर्ति करावी असा अभिप्राय.

**ॐ स्वस्ति । साम्राज्यं । भौज्यम् । स्वाराज्यम् । वैराज्यम् । पारमेष्ठ्यम् । राज्यम् । महाराज्यम् । अधिपत्यम् । अयम् । समन्तपर्यायीस्यात । सार्वभौम: । सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिव्यैसमुद्रपर्यंताया एकराळिति।।**

**(ऐतरेय ब्राह्मण अध्याय ३९ खंड १ अनुवाक् १५)**

एकछत्री राज्य, उपभोगाक्षम भूमी, प्रजेला नेहमी आपले वाटणारे, विशिष्ट राजचिन्हाने ओळखले जाणारे, नियंत्रांत असलेले, एकच राजा हा ज्या राज्याचा स्वामी आहे, ज्याच्या राज्याच्या मर्यादा विश्वव्यापी असून ज्याचे वर्णन करता येत नाही, अन्य राज्यांच्या सीमांना स्पर्श न करणारे, प्रदीर्घ परंपरा लाभलेले, समुद्र ही ज्याच्या राज्याची सीमा आहे, भविष्य काळात सुद्धा या सीमांना धक्का लागणार नाही असे या पृथ्वीवरील, एकछत्री एकुलत्या एक अशा राज्याचे आणि राजाचे कल्याण होवो.

ऐतरेय ब्राह्मणावर सायणाचार्य यांचे भाष्य आहे.

राजाला कोणत्या प्रकारच्या जयादि फळांचा लाभ व्हावा, असे राजा, प्रजा आणि राजाला आशीर्वाद देणारे वेदज्ञ ब्राह्मण यांना वाटते त्याचा उल्लेख या मंत्रांत करण्यात आला आहे. सर्व प्रथम इन्द्र शत्रूनिर्दालनाच्या निमित्ताने आपल्या राजमंदिराच्या बाहेर पडत असता ऋषींनी त्याला प्रस्तुतच्या कार्यात विजयी व्हावे म्हणून जे आशीर्वचन प्रदान केले ते आशीर्वचन म्हणजे प्रस्तुतचा मंत्र होय. इंद्र हा देवांचा राजा आहे. त्याला विजय प्राप्त व्हावा म्हणून आशीर्वाद देण्यात आला आणि त्याप्रमाणे तो विजयी झाला. त्याप्रमाणे विष्णूंचा अंश आणि पृथ्वीचा स्वामी म्हणून मिरविणारा राजा ज्यावेळी युद्धाच्या निमित्ताने जात असे तेव्हा राजवाड्यातून बाहेर पडतांना मार्गावर दोन्ही बाजूला वेदज्ञ ब्राह्मण उभे राहात. सुहासिनी त्याला ओवाळण्यासाठी हातात प्रज्वलित दीप घेऊन उभ्या राहात. बाकीचे नगरनिवासी प्रजाजन हाता फुले किंवा अक्षता घेऊन उभे राहात. राजा जाऊ लाग ग म्हणजे ब्राह्मण, आशीर्वचन म्हणंत, सुहासिनी ओवाळीत आणि अन्य प्रजाजन राजावर फुले किंवा अक्षता उधळीत आणि राजाचे अभीष्ट आणि विजयश्रींचे चिंतन करीत. त्यावेळी जे मंत्र पूर्वी म्हटले जात होते तेच मंत्र या ठिकाणी आहेत. या मंत्रातील बरेच शब्द बाह्यत: सारख्या अर्थाचे असावेत असे वाटते परंतु त्या प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ आहे. त्यामुळे राजाचे राज्य त्याला काल, देश वैभव आणि मर्यादा यांचा चांगला बोध होईल.

**स्वस्ति :–** या पदाचा शब्दश: अर्थ कल्याण असो असा आहे. हा शब्द प्रापंचिक आणि पारमार्थिक कल्याणासाठी वापरण्यात येतो. त्यामुळे या एका शब्दाने विस्तृत कल्याणाच्या मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. केवळ हा एक शब्द म्हणजे स्वतंत्र आशीर्वाद आहे. या शब्दाच्या पुढे अगर मागे एखादे पद ठेऊन या आशीर्वादाला मर्यादा निर्माण करण्याची एक प्रथा अस्तित्वात आहे. उदा. स्वस्तिश्री - श्री या शब्दाने निर्देश केलेल्या गोष्टीमधून कल्याण प्राप्त व्हावे असा आशय आहे. श्री म्हणजे काय हे पुढील ऋचेमध्ये सांगण्यात आले आहे.

**श्रीवर्चस्वमायुष्यरोग्यमविधाशोभमानं महीयते ।**
**धनं धान्यं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरें दीर्घआयु: ॥**

**(श्रीसूक्त फलश्रुति)**

सत्ता, आयुष्य, आरोग्य सौंदर्य, महनीयता, धन, धान्य, पशु, पुत्रपौत्रादिक, शतवर्षांचे आयुष्य आणि दीर्घायुष्य या सर्वांना मिळून श्री अशी संज्ञा आहे.

या शिवाय पारमार्थिक वैभव, गुरुकृपा, वगैरेंचा समावेश यांमध्ये नाही. म्हणून केवळ स्वस्ति या एकपद आशीर्वादाला विशेष महत्त्व आहे.

**साम्राज्यं :–** ज्या भूभागावर अन्य कोणाचेही अधिपत्य नाही असे एकाच राजाच्या छत्रातील असणारे राज्य.

**भौज्यम् :–** ज्या राज्यामध्ये, इंद्राच्या राज्यांत जे उपभोग उपलब्ध आहेत ते ज्या राज्यात आहेत असे राज्य.

**स्वराज्यम् :–** प्रजेतील प्रत्येकाला हे राज्य आपले आहे असे प्रेमळपणाने वाटते असे प्रजाधिष्ठित राज्य.

**वैराज्यम् :–** ज्या राज्याचा राजा, प्रजानुरंजन, प्रजेचे सुख आणि उचित प्रजान्याय यांमध्ये दक्ष असून स्वत:च्या भोगांकडे मर्यादित नजरेने पाहातो अशा राजाचे राज्य.

**पारमेष्ठ्यमं :–** विशिष्ट राजचिन्हाने किंवा चिन्हामुळे ओळखले जाणारे सर्वश्रेष्ठ राज्य.

**राज्यम् :–** शासकीय नियंत्रणाने व्यापलेला भूभाग ज्या ठिकाणी राजाच्या आज्ञेचे यथार्थ परिपालन केले जाते असे राज्य.

**महाराज्यम् :–** ज्या राज्याची सर्वगुणमय कीर्ती सुदूर पसरली आहे असे राज्य.

**अधिपत्यम् :–** ज्या राज्याचा राजा हा पूर्णार्थाने स्वामी आहे असे राज्य. मांडलिक राजा सुद्धा राज्याचा अधिपति असतो पण त्यावर अन्य राजाचे अधिपत्य आहे असा राजा अगर त्याचे राज्य नव्हे.

**समन्तपर्यायी :–** विश्वव्यापी. ज्याच्या मर्यादा शब्दांनी वर्णन करता येत नाही असे राज्य.





**सार्वभौम :**– चक्रवर्ती. अन्य राज्याचा सीमांचा स्पर्श न होणारे राज्य.

**सार्वायुष्य :**– प्रदीर्घ काळात राजपरंपरेने चालत आलेले राज्य.

**आंतादा :**– समुद्रतीर या राज्याच्या सीमा असणारे राज्य.

**परार्धात :**– भविष्यकाळात सुद्धा ज्या राज्याच्या अस्तित्वाला धक्का लागणार नाही असे अगणित कालमर्यादा लाभाणारे राज्य (परार्ध हा संख्यावचक शब्द आहे.)

**पृथिव्यै :**– पृथ्वीवरील राज्य. ज्या भूभागाच्या सीमा समुद्राने मर्यादित केल्या आहेत असे पृथ्वीचे राज्य.

**एकराड् :**– एक छत्री - एकुलते एक राज्य.

**पुरुषार्थभिषेकार्थ उदीर्यते ।** पुरुषार्थ प्राप्त व्हावा, पुरुषार्थ प्राप्त झाला तर तो प्रदीर्घ काळ टिकावा म्हणून सामान्य व्यक्तीच्या मस्तकी मंत्रजल शिंपडून आशीर्वाद देण्यासाठी सुद्धा पूर्वी या मंत्राचा उपयोग करण्यात येत आहे. थोडक्यात कोणाही व्यक्तीच्या मागे सदिच्छांचा आधार निर्माण करणे हा या मंत्राच्या मागील एक हेतू आहे.

**तदप्येषश्लोकोऽभिगितो । मरुत: परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा: सभासद इति ।।**

**(ऐतरेय ब्राह्मण अध्याय ३९ खंड ७ अनुवाक् २१)**

**पदच्छेद :**– तद् अपि एष: श्लोक अभिगीत: । मरुत: परिवेष्टार: मरुत् तस्य आवसन् गृहे । आवीक्षितस्य कामप्रे: विश्वेदेवा: सभासद: इति।।

**सरळ अर्थ :**– मरुताच्या घरांत असणारे सर्वदेव, सर्व प्रकारच्या इच्छांची परिपूर्ति करणारे आहेत. मरुताने गुप्त ठेवलेल्या इच्छा त्याला मूर्त स्वरुपातगोचर व्हाव्यात म्हणून त्या देवांनी ह्या श्लोकांचे पठण केले.

या मंत्रावर सायणाचार्य यांचे भाष्य आहे. मागील मंत्रामध्ये आशीर्वादाचे जे स्वरूप दर्शविण्यात आले आहे त्याप्रमाणे पूर्वी कोणी असा आशीर्वाद प्रदान केला होता का? या शंकेचे उत्तर देण्यासाठी या मंत्राचा प्रपंच करण्यात आला आहे.

अशी एक कथाआहे की संवर्तक नावाचा अंगिरस ऋषींचा एक पुत्र होता. तो मोठा ज्ञानी आणि सिद्धवचनी होता. मरुत्त ही वैदिक देवता आहे. या देवतेला राजन्यत्व हे सर्वोच्च पद प्राप्त व्हावे म्हणून आशीर्वादासाठी अनेक प्रज्ञावंत ब्राह्मणांना पाचारण करण्यात आले होते. या ब्राह्मणांची यथायोग्य पूजा करून त्यांचा सन्मान करण्यात आला. सर्व ब्राह्मण भोजनास बसले. पोटभर जेवण झाल्यावर मरुत्ताला राजन्यत्व प्राप्त व्हावे ही गुप्त ठेवलेली इच्छा संवर्तकाने सर्व ब्राह्मणांसमोर प्रकट केली त्या वेळी मरुताच्या घरी एकत्रित बसलेल्या ब्राह्मणांनी मरुताच्या कल्याणासाठी संपूर्ण इच्छांची परिपूर्ति करणारे हे मंत्र उच्च स्वराने म्हटले आणि त्यावेळी मरुताला मंत्राक्षता त्याच्या मस्तकी टाकून समर्थ करण्यात आले.

अशा तऱ्हेचा पूर्वानुभव असल्याने मनांत शंका बाळगण्याचे कारण नाही. या मंत्रांचे सामर्थ्य अबाधित आहे त्यामुळे आजही त्या मंत्रांच्या पठणांतून अपेक्षित फळाची प्राप्ति होईल असा विश्वास या ठिकाणी प्रकट करण्यात आला आहे. त्यामुळेच कोणत्याही पूजेनंतर पार्थनेचा समारोप या सर्वमंगल अशा मंत्रपुष्पांजलीने केला जातो.

卐 卐 卐

---

## कांडण

**- डॉ. यु. म. पठाण**

संत प्रापंचिक जीवनातील अनेक व्यवहारांचा परमार्थ समजावून सांगण्यासाठी उपयोग करून घेतात. इथं ते आपल्या विचारविश्वाची जनसामान्यांच्या अनुभवविश्वासी सांगड घालतात. याचा एक लाभ असा होतो. की, सामान्य जीवन जगणारा माणूसही ऐहिक जीवनात आपण पारमार्थिक साधनाकशी करू शकतो, याचा विचार करू लागतो. त्यांच्या दैनंदिन जीवनातही अशा प्रकारे भक्तीच्या व साधनेच्या विचाराचा प्रारंभ होतो.

जनाबाईनं 'जात' नावाचं भारूड लिहिलेलं आहे. जीवनातील परिचित गोष्ट व तिच्याशी 'दळण' निगडित आहे, पण दळणाप्रमाणे कांडणही ग्रामवासियांना परिचित आहे. काही प्रमाणात नगरवासीयानांही परिचित आहे. 'कांडणा' शी उखळ नि मुसळ यांचाही संबंध येतो. संत एकनाथांनी या साऱ्यांचा अर्थ किती वेगळ्या प्रकारे सांगितला आहे पाहा -

विवेक-कांडणी कांडिते, साजणी ।<br>
निजबोध-स्मरणी फिरतसे ॥<br>
देहे हे उखळ, मन हे मुसळ ।<br>
कांडिले तांदूळ विवेकाचे ॥<br>
एका जनार्दनीं कांडण कांडितां ।<br>
ब्रह्म सायुज्यता प्राप्त झाली ॥

या भारुडातील स्त्री आपल्या मैत्रीणीला सांगते, की मी कांडताना आत्मज्ञानाच्या माळेच्या साह्याने परमेश्वराचं चिंतन करते आहे, जप करते आहे. विवेकाचा जीवनात किती उपयोग होतो ! या विवेकानंच आपण चांगल्या आणि वाईट गोष्टीतील भेद जाणू शकतो.

आपलं शरीर म्हणजे जणू काही एक उखळ आहे आणि मन हे त्यातलं मुसळ आहे. त्याने विवेकाचे तांदूळ सडायचे, कांडायचे आहेत. या विवेकानं आपल्या कर्मांचा पुनर्विचार करायचा आहे. भात सडताना त्यावरील साली-टरफलं काढून टाकली जातात, त्या प्रमाणे आपल्या कर्मांना विवेकाच्या कसोटीवर पडताळून पाहिल्यावर योग्य कर्म कोणती निअयोग्य कर्म कोणती, याची आपल्याला कल्पना येते. आपल्या कर्मांवर जे विकारांचं, असत प्रवृत्तींच आवरण येतं ते काढूनटाकायला हवं. त्यातला सात्विक प्रवृत्तींचा गाभा जोपायसायला हवा. विकार, अयोग्य; प्रवृत्ती टाळल्या, की आपलं जीवन पवित्र होतं, सुखी होतं. आपल्याहातून पाप वा अपराध घडत नाही. आसपण नितळ, निष्पाप, निरपराध निर्मळ जीवन जगू लागतो. असं जीवन जगणं हेच खरं जगणं आहे. त्यामुळंच आपल्याला आपलं सत्व, 'स्व'त्व शोधता येतं.


आपण असे 'सात्विक' झालो, की पापांचा भुसा नि कोंडा गळून पडतो. सत्वाचे कण गवसू लागतात. परमेश्वराशी एकरूप होण्याचा हा किती साधा आणि सोपा मार्ग आहे नाही ?

(दै. सकाळ यांच्या सौजन्याने)

# वैष्णोदेवी

## महालक्ष्मी, काली व सरस्वतीचा महासमन्वय

❀ विद्याधर ताठे ❀



*वैष्णोदेवीच्या गुहेतील तीन पिंडी.*

*भारतातील ५१ प्रमुख शक्तीस्थानांपैकी एक स्थान असलेल्या काश्मीरमधील वैष्णोदेवीचा महिमा अगाध व अपार आहे. महालक्ष्मी–काली आणि सरस्वती अशा तीन देवींच्या तेथे पिंडी असून वैष्णोदेवी म्हणजे या तीन देवींचा महासमन्वय – त्रिवेणी संगम आहे.*

*दसऱ्यानिमित्त महाराष्ट्रातील अंबाबाई, तुळजाभवानी, सप्तश्रृंगी आणि माहूरगड निवासिनी या शक्ती देवतांचे भक्तीने पूजन–स्मरण आपण करतोच. श्रीसाईलीलाचे कार्यकारी संपादक श्री विद्याधर ताठे नुकतेच वैष्णोदेवीला जावून आले असून त्यांनी लिहिलेला लेख वाचकांना वैष्णोदेवीचे शब्ददर्शन घडवेल.*





### प्रास्ताविक : –

**या देवी सर्वभूतेषू शक्तिरुपेण संस्थिता: ।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम: ॥**

**(दुर्गासप्तशती)**

सर्व प्राणीमात्रांमध्ये शक्तीरुपाने वास करणाऱ्या देवीस माझे पुन्हा पुन्हा नमन असो; अशा देवीस्तुतीचा **'सप्तशती'** हा एक देवी उपासनेतील अलौकिक ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये देवीच्या स्तुतीबरोबरच देवीचे वरदान–दुष्टसंहार आणि विविध लीलांचे वर्णन आहे. भारतवर्षामध्ये देवीची ५१ शक्तीपीठे प्रसिद्ध आहेत. कोल्हापूरची जगदंबा, तुळजापूरची भवानीमाता, सप्तश्रृंगगडावरील सप्तश्रृंगी माता आणि माहूरगडावरील माहूरगडनिवासिनी ही महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठे या शक्तीदेवतांनीच महाराष्ट्राला महा-राष्ट्र म्हणून वैभव प्राप्त करून दिले. महाराष्ट्रातील क्षात्रतेजाला प्रेरणा व स्फूर्ती देण्याचे ऐतिहासिक कार्य या पीठांनी केलेले आहे **'दार उघड बये, आता दार उघड !** असे म्हणत संत एकनाथांच्या भारूडांनी मृतवत झालेल्या महाराष्ट्रास क्षात्रतेजाचा नवा संजीवनी मंत्र दिला आणि आई तुळजाभवानीच्या कृपेने पुढे महाराष्ट्रात शिवरायांचा अवतार झाला. यामुळेच महाराष्ट्रात **'जय शिवाजी'** बरोबरच **'जय भवानी'** या घोषणेला पौरुषत्त्वाचे एक वेगळे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे.

महाराष्ट्राबाहेर शक्तीदेवतेची जी कांही स्थाने आहेत त्यामध्ये आसाममधील कामारण्या, कलकत्त्याची कालिमाता आणि काश्मीर मधील वैष्णोदेवी ही मुख्य प्रसिद्ध स्थाने आहेत. कलकत्त्याच्या कालिमातेचे भक्त रामकृष्ण परमहंस व त्यांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांचे अलौकिक कार्य ही कालिमातेचीच अगाध लीला आहे.

### वैष्णोदेवीचे स्थान

भगवती वैष्णोदेवीचे शक्तीपीठ जम्मू-काश्मीर राज्यात असून जम्मू शहरापासून हे स्थान २ तासाच्या अंतरावर आहे. जम्मूपासून बसने २ तासात आपण 'कटरा' नामक गावात जातो. या गावात मोठी बाजारपेठ असून ती रात्री १-१॥ पर्यंत उघडी असते हे तिचे वैशिष्ट्य आहे. या गावात भक्तांच्या सहाय्यासाठी अनेक हॉटेल्स व धर्मशाळा आहेत. या गावामध्ये [illegible] श्री वैष्णोदेवी ट्रस्टचे कार्यालय असून तेथे पास घेऊन [illegible] करावा लागतो. अन्यथा बाणगंगा येथील पुढ[illegible] लागते [illegible] फक्त मिळतो. [illegible] देवीच्या गडावर कोणासही सोडले जात नाही [illegible] तपासला जातो.

'कटरा' गावातून आपणास १२ किमी. एवढे अंतर गड चढून पार करावे लागते येथे गडावर चढून जाण्यास सिमेंटचा सुरेख मार्ग बांधलेला आहे. सर्वत्र लाईटची - स्वच्छतागृहाची विश्रांतीस्थानाची अगदी उत्तम व्यवस्था असून हा रस्ता २४ तास भक्तांसाठी खुला असतो व २४ तास भक्तांची खूप वर्दळही असते. चालत वर चढण्यास सुमारे २॥ ते ३ तास लागतात. येथे घोड्यांची सोय असून घोड्याचा सरकारी दर रु. ८०/- असला तरी १५०-२०० रु. देऊनच घोडा लवकर उपलब्ध होतो. घोड्यावर बसून वर जाण्यासही २ तास लागतात. बरेच भक्त भाविक रात्रीच्या शांत अल्हाददायक वातावरणात पायी गड चढतात आणि पहाटे दर्शन करून रामप्रहरी खाली उतरतात. यामुळे रात्रीचा व दिवसाचा असा दोन्ही वेळचा प्रवास अनुभवता येतो. रात्रीच्या लख्ख प्रकाशात रुपेरी किरणांच्या पडद्यातून गडाची चढण चढण्याचा आनंद एक स्वर्गसुखाचा उनुपम सोहळा आहे. दिवसा खूप उन असते. त्यामुळे चढण चढताना भाविक घामाने व उकाड्याने हैराण होऊन जातो. त्यातून तेथील निसर्ग अगदी लहरी आहे. क्षणात उन तर क्षणात धुक्याचे ढग, क्षणात पावसाची रिमझीम आणि पुन्हा सूर्यप्रकाश.

### वैष्णोदेवीचा मार्ग

कटरापासून देवीच्या गडाचा मुख्य दरवाजा १ किलोमिटर दूर असून या दरवाजापर्यंत रिक्षाने जाता येते. या मुख्य दरवाजातून पुढे गेल्यावर बाणगंगा नावाची नदी लागते. या नदीत काही भाविक स्नान करून गडाची चढण चढण्यास प्रारंभ करतात. येथे बाणगंगा देवीचे छोटेसे देऊळ आहे त्या देवीचे दर्शन हेच बाणगंगेचे स्नान समजून अनेक भाविक मनाने शुचिर्भूत होऊन पुढील वाटचाल सुरू करतात. पुढे सुमारे दीड कि.मी. चढून जालाच **'चरण पादुका'** म्हणून स्थान लागते. पायी चढणारे भाविक येथे दर्शन करतात पण घोड्यावरून जाणाऱ्या भाविकांना कोठेही वाटेत न उतरविता घोडेवाले थेट वर घेऊनजातात. त्यामुळे त्यांना वाटेतील स्थळांची-स्थानांची माहिती होत नाही. त्यापुढील चढणीत अनुक्रमे आदिकुमारी, हत्तीमाथा, सांझी छत ही प्रमुख स्थाने लागतात. या चढणीमध्ये **'हत्तीमाथा'** व **'सांझीछत'** ही सर्वाधिक उंचीवर असून ती समुद्रसपाटीपासून अनुक्रमे ६५०० फूट व ७२०० फूट उंच आहेत. खुद्द वैष्णोदेवीचे स्थान समुद्रसपाटीपासून ५२०० फूट उंचीवर आहे. सांझी छतापासूनआपणास वैष्णोदेवी दरबारात जाण्यास सुमारे २००० फूट खाली उतरावे लागते. वैष्णोदेवीच्या गडावर आहे. त्या गडाच्या परिसरास **'दरबार'** असे म्हणतात. एवढ्या उंचीवर ट्रस्टने भव्य इमारती बांधून भक्त भाविकांच्या सर्व प्रकारच्या सोई केलेल्याआहेत.

तेथे कोणत्याही प्रकारची गैरसोय जाणवत नाही. देशातील विविध देवस्थान ट्रस्टनी येथील व्यवस्था आदर्श म्हणून अनुकरण करण्यासारखी आहे.

## वैष्णोदेवीचा महिमा

कटरा जवळील **'हन्साली'** नावाच्या खेड्यात **श्रीधर** नावाचा देवीचा परमभक्त रहात होता. तो नित्यनेमाने दर शुक्रवारी-मंगळवारी गावातील कुमारिकांना बोलावून तो त्यांची मनोभावे पूजा करी. एके दिवशी या भक्तीभावाने संतुष्ट होऊन वैष्णोदेवी कुमारिकेचे रूप घेऊन इतर कुमारिकामंध्ये येऊन बसते. त्या कुमारीकेचे तेज पाहून श्रीधर देवीला ओळखतो. तो देवीस काही प्रार्थना करणार एवढ्यात देवी म्हणते तुझ्या 'कुमारीका पूजन' या व्रताने मी संतुष्ट झाले आहे. त्या व्रताचे उद्यापन करण्यासाठी पुढील शुक्रवारी सर्व गावाला जेवायला बोलव. देवीच्या आज्ञेप्रमाणे श्रीधर सर्व गावाला शुक्रवारचे जेवणाचे निमंत्रण देऊन येतो. शुक्रवार उजाडतो सारा गाव श्रीधरच्या घरापुढे हळूहळू जमू लागतो. जेवणाची कोणतीच सिद्धता दिसत नाही आता लोक आपणास मारणार या भीतीने श्रीधर चिंताग्रस्त होतो. भक्तांची चिंता पाहून देवी सत्वर धावून येते. गाव जेवण आनंदात-समाधानात पार पडते. या जेवणासाठी काही साधू आले होते. त्यात भैरवनाथ व त्यांचे ३६० शिष्य असतात.

'आम्हास कोणीही यथेच्छ भोजन देऊ शकत नाही. भोजन देणाऱ्या दात्याला पश्चाताप होतो व आमची क्षमा मागावी लागते' अशी ३६० शिष्य यांची ख्याती असते. पण श्रीधरच्या कुटीत जेवताना अखेर त्यांची हार होते. ते मागतात त्यापेक्षा अधिक पदार्थ त्यांना आग्रहाने वाढले जातात. यामागे निश्चितच कोण्या देवी-देवतेचा शक्ती संचार असावा असे त्यांच्या लक्षात येते. भैरवनाथ देवीला मिष्टान्ना ऐवजी मांस-मदिरा मागतो पण देवी म्हणते हा 'ब्राह्मणांच्या व्रताच्या उद्यापनाचा भंडारा आहे येथे फक्त मिष्टान्नच मिळेल'. यावरूनच पुढे त्या देवीचे नाव वैष्णोदेवी 'वैष्णवांची देवी' असे प्रचलित होते. भैरवनाथ हट्टी असतो तो आपली परीक्षा घेतो आहे हे देवीच्या लक्षात येते. रागाने-क्रोधाने लाल झालेला भैरव जेव्हा कुमारीकेच्या रूपातील देवीचा हात पकडण्याचा प्रयत्न करतो तेव्हढ्यात देवी अंतर्धान पावते व त्रिकुट पर्वताकडे प्रयाण करते. भैरवनाथ सिद्ध महायोगी असतो तो योगबळाने देवीच्या मागे लागतो. भैरवनाथाला ठार करण्याचा योग्य काळ अद्यापी आलेला नाही म्हणून देवी त्रिकुट पर्वतातील गुहेत नऊ महिने ध्यानस्थ बसते. व नंतर बाहेर येऊन भैरवाचा वध करते.

ज्या गुहेत देवी ९ महिने ध्यानस्थ बसते ती गुहा व ते स्थान म्हणजेच आपण ज्या वैष्णोदेवीच्या दर्शनास जातो ते होय. त्रिकुटपर्वतावरील एका गुहेच्या आत हे स्थान असून भक्तांना पूर्वी गुढध्यावर रांगत आत जावे लागत होते. अलिकडे देवस्थान ट्रस्टने गुहा रूंद केली असून आता एका बाजूने आत जाऊन दुसऱ्या बाजूने बाहेर येण्याची उत्तम सोय देवस्थानने केलेली आहे. देवीच्या गाभाऱ्यात तीन पिंडी असून **(१) महालक्ष्मी (२) कालिमाता** व **(३) सरस्वती** अशा तीन देवींचे ते प्रतिक रूप आहे. थोडक्यात **वैष्णोदेवी हे महालक्ष्मी-काली व सरस्वतीचे महासमन्वय रूप आहे.** तीन नद्यांचा त्रिवेणी संगम पवित्र व पुण्यप्रद असतो. वैष्णोदेवी तर तीन देवतांचा संगम आहे तो केव्हढा पवित्र व पुण्यप्रद असेल ! वैष्णोदेवीचे महात्म्य कथन करावे तेव्हढे थोडे आहे. हे महात्म्य शब्दात सांगता येणे शक्य नाही. प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा - प्रत्यक्ष प्रचिती घेण्याचाच तो विषय आहे. आपण प्रत्यक्ष प्रचिती घेण्यास वैष्णोदेवीच्या दर्शनास जावे एवढाच या लेखनप्रपंचाचा मर्यादीत हेतू आहे.

卐



वैष्णोदेवी दरबाराचे विहंगम दृष्य